सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, २३ ऑगस्ट २०२४ | वर्ष दुसरे | अंक १५१ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आम्ही सदैव शांततेचे पुरस्कर्ते

## झेलेन्स्की यांच्या भेटीत पंतप्रधान मोदी यांचे प्रतिपादन

**कीव, २३ ऑगस्ट**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी युक्रेनच्या दौऱ्यात राजधानी कीव येथे राष्ट्रपती वोलोदिमिर झेलेन्स्की यांची भेट घेतली. कोणत्याही युद्धात भारत कधीच तटस्थ राहिला नाही. आम्ही नेहमीच शांततेचे पुरस्कर्ते राहिलो आहोत. संघर्ष कितीही मोठा असो, चर्चा आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून त्यावर तोडगा काढला जाऊ शकतो, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या पृष्ठभूमीवर पंतप्रधान मोदी आज कीव येथे दाखल झाले. राष्ट्रपती झेलेन्स्की यांच्या शासकीय निवासस्थानी दोन्ही नेत्यांमध्ये बैठक झाली. या युद्धात भारताची भूमिका स्पष्ट करताना मोदी म्हणाले की, युद्ध आणि हिंसाचारातून कोणत्याही समस्येवर तोडगा निघू शकत नाही. युद्धामुळे लहान मुले आणि तरुण पिढींचे भवितव्य अंधारात जात असते. स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी चर्चा हाच एकमेव मार्ग आहे. या क्षेत्रातही शांतता स्थापन करण्यासाठी भारत सक्रिय भूमिका पार पाडेल. आता युद्ध थांबविण्याची वेळ आली आहे. रशिया आणि युक्रेनने चर्चेच्या टेबलवर एकत्र यायला हवे. यात आम्ही आवश्यक ते सहकार्य करायला तयार आहोत.

**चार महत्त्वाच्या करारांवर स्वाक्षऱ्या**

या बैठकीपूर्वी भारत आणि युक्रेनमध्ये चार महत्त्वाच्या करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. मानवीय मदत, कृषी, चिकित्सा आणि सांस्कृतिक क्षेत्रात परस्पर सहकार्य वाढविणारे हे करार आहेत.

**संयुक्त राष्ट्रालाही मोदींकडून अपेक्षा**

विशेष म्हणजे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या युक्रेन दौऱ्याचे संयुक्त राष्ट्रानेही स्वागत केले आहे. युनोचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी, मोदी यांच्या दौऱ्यामुळे रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध रोखण्यात मोठी मदत मिळू शकते, अशी अपेक्षा व्यक्त केली. (वृत्तसंस्था)



युक्रेनच्या भेटीवर आलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांच्या पाठीवर हात ठेवून त्यांना एकप्रकारे धीर देण्याचा प्रयत्न केला

## रशियाकडून तात्पुरता युद्धविराम

**मॉस्को, २३ ऑगस्ट**

गेल्या काही वर्षांत जागतिक स्तरावर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपली जी प्रतिमा निर्माण केली आहे, त्यामुळे बहुतांश देश त्यांना उचित सन्मान देऊ लागले आहेत. आता तर रशियाने युक्रेन दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधान मोदींच्या सन्मानार्थ आपले युद्धहल्लेही तात्पुरते थांबवून भारताविषयी आणि मोदींविषयी असणारा आपला आदरभावच प्रगट केला आहे.

पंतप्रधान मोदी यांनी जगातील विविध संवेदनशील विषयांवर घेतलेली भूमिका, प्रसंगी ठामपणे व्यक्त केलेले मत यामुळे त्यांची प्रतिमा अधिकच उजळली आहे. जेव्हा रशिया आणि युक्रेन युद्ध सुरू झाले, तेव्हा पंतप्रधान मोदींनी घेतलेली भूमिका या दोन देशांसह संपूर्ण जगाने स्वीकारली. अन्य देश या दोन्ही युद्धभूमींवर विभागले गेले. मात्र, भारताने कायम शांततेचा पर्याय स्वीकारला असल्याचे सांगत या संघर्षाला ठामपणे विरोध केला. म्हणूनच रशियाचे पुतिन आणि युक्रेनचे झेलेन्स्की हे दोन्ही सर्वोच्च नेते मोदींच्या शब्दाला मान देतात. सध्या पंतप्रधान मोदी युक्रेन दौऱ्यावर आहेत. यावरून रशियाने आगपाखड न करता उलट ते तिथे असेपर्यंत युद्धाला विराम दिला आहे. (वृत्तसंस्था)

# हायकोर्टाचा दणका; महाराष्ट्र बंद मागे

## शरद पवारांनी केली काँग्रेस, उबाठाची कोंडी

**मुंबई, २३ ऑगस्ट**

बदलापूर येथे दोन चिमुकल्या मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या विरोधात महाविकास आघाडीने शनिवारी पुकारलेला एक दिवसाचा महाराष्ट्र बंद हायकोर्टाच्या दणक्यानंतर मागे घेण्यात आला. मात्र, या प्रक्रियेत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रमुख शरद पवार यांनी आपल्या सहकारी पक्षांना फरपटत नेल्याचे चित्र दिसून आले.

महाविकास आघाडीच्या या प्रस्तावित बंदला अॅड. गुणरत्न सदावर्ते यांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. यावर निकाल देताना न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाचा दाखला देत हा बंद बेकायदेशीर ठरवला. कोणत्याही राजकीय पक्षाला बंदच्या माध्यमातून जनतेला वेठीस धरता येणार नाही, असा निर्वाळा न्यायालयाने दिला. न्यायालयाचा हा निर्णय येताच शरद पवार यांनी सहकारी पक्षांना विचारात न घेता एक्सवर ट्विट करीत बंद मागे घेण्याचे आवाहन केले.


बदलापूरमधली घटना अत्यंत दुर्दैवी असून, त्याविरोधात जनभावना प्रक्षुब्ध आहेत. या भावना लक्षात घेत घटनेचा मूलभूत अधिकार वापरत आम्ही बंदची हाक दिली होती. मात्र, उच्च न्यायालयाने हा बंद घटनाबाह्य असल्याचा निर्वाळा दिला. न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याइतका पुरेसा वेळ नसल्यामुळे आम्ही या बंदमधून माघार घेत असल्याचे शरद पवार यांनी जाहीर केले. दीड तासांतच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शरद पवारांच्या ताज्या भूमिकेला साथ दिली. आम्ही बंदमध्ये सहभागी होणार नाही. मात्र, सकाळी ११ ते दुपारी १० वाजेपर्यंत तोंडाला काळ्या पट्ट्या बांधून तसेच काळे झेंडे फडकवत आम्ही निषेध करू, असे पटोले म्हणाले.

**उद्धव ठाकरे अधांतरीच**

दरम्यानच्या काळात उद्धव ठाकरे यांनी सायंकाळी सात वाजता भूमिका स्पष्ट करण्याची घोषणा केली होती. मात्र, त्याआधीच शरद पवार यांनी पुन्हा एकदा ठाकरेंना एकाकी पाडले. अखेर ठाकरेंचा नाईलाज झाला. आपली कोंडी झाल्याचे लक्षात आल्यानंतर सायंकाळी सात वाजता ठाकरे यांनीही सर्वोच्च न्यायालयात जाण्याइतका वेळ नसल्याने बंद मागे घेत असल्याचे जाहीर केले. (तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### ऑटो शेअर्सनी बाजाराला तारले



**मुंबई** : शेअर बाजारातील गुंतवणूकदारांसाठी आठवड्याचा शेवटचा दिवस काही अंशी चांगला ठरला. ऑटो शेअर्सनी साथ दिल्याने देशांतर्गत बाजारातील निर्देशांक, निफ्टी किंचित वाढीसह स्थिरावले. आयटी शेअर्समध्ये घट झाल्याने बाजार चिंतेत असताना ऑटो शेअर्सनी बाजाराला तारले. दिवसअखेर निर्देशांकात ३३ अंकांची का होईना वाढ झाली आणि तो ८१,०८६ वर बंद झाला. तसेच राष्ट्रीय बाजारातील निफ्टी १२ अंकांच्या वाढीसह २४,८२३ वर बंद झाला. निर्देशांकातील ३० पैकी १७ शेअर्स वाढीसह तर १३ तोट्यासह बंद झाले. निफ्टीतील ५० पैकी २१ शेअर्स तेजीत होते.

### दहावी, बारावी पुरवणी परीक्षेचा निकाल जाहीर

**पुणे** : राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी, बारावीच्या पुरवणी परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर करण्यात आला. यामध्ये दहावीत ३७ टक्के, तर बारावीत ३२ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. दहावीच्या परीक्षेतील विद्यार्थ्यांची कामगिरी गेल्यावेळेच्या तुलनेत चांगली असल्याचे दिसून आले. त्या तुलनेने बारावीतील विद्यार्थ्यांची कामगिरी मागील वर्षीप्रमाणेच असल्याचे मंडळाने सांगितले.

### केजरीवाल ५ सप्टेंबरपर्यंत तिहारमध्येच राहणार

**नवी दिल्ली** : मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ५ सप्टेंबरपर्यंत तिहार कारागृहातच मुक्कामी राहावे लागणार आहे. कोट्यवधी रुपयांच्या मद्य घोटाळाप्रकरणी सीबीआयने केलेल्या अटकेला आव्हान देणाऱ्या तसेच जामिनावरील याचिकांवरील सुनावणी सर्वोच्च न्यायालयाने ५ सप्टेंबरपर्यंत



तहकूब केली आहे. न्या. सूर्य कांत आणि न्या. उज्ज्वल भूयान यांच्या न्यायासनाने सीबीआयला या प्रकरणी प्रतिशपथपत्र सादर करण्याची तसेच त्यानंतरच्या दोन दिवसांत केजरीवाल यांना आपले म्हणणे मांडण्याची मुभा दिली. केजरीवालांची बाजू मांडताना त्यांचे वकील अभिषेक सिंघवी म्हणाले की, केवळ एकाच याचिकेवर सीबीआयने प्रतिशपथपत्र सादर केले असून, त्याची प्रत आम्हाला गुरुवारी रात्री मिळाली. यावर सीबीआयतर्फे युक्तिवाद करताना सहायक महान्यायाभिकर्ता एस. व्ही. राजू म्हणाले, केजरीवाल यांच्या अन्य याचिकेवर आम्ही एक आठवड्याच्या आत प्रतिशपथपत्र सादर करणार आहोत. यानंतर न्यायालयाने हे प्रकरण ५ सप्टेंबरपर्यंत तहकूब केले. सर्वोच्च न्यायालयाने १४ ऑगस्ट रोजी केजरीवाल यांना अंतरिम जामीन देण्यास नकार देताना, अटकेला आव्हान देणाऱ्या केजरीवालांच्या याचिकेवर उत्तर सादर करण्यास सांगितले होते. सीबीआयने २६ जून रोजी केजरीवाल यांना तिहार कारागृहात अटक केली होती.

# अनिल अंबानींवर सेबीचा सर्जिकल स्ट्राईक

## पाच वर्षे शेअर बाजारात बंदी
## २५ कोटींचा दंड

**नवी दिल्ली, २३ ऑगस्ट**



निधीचा गैरवापर केल्याप्रकरणी बाजार नियामक सेबीने उद्योगपती अनिल अंबानी यांना शेअर बाजारातून पाच वर्षांसाठी बंदी घातली आहे. अंबानींना २५ कोटींचा दंडही ठोठावण्यात आला. त्यांना कोणत्याही लिस्टेड कंपनीत संचालक होण्यास बंदी आहे. त्यांच्या व्यतिरिक्त रिलायन्स होम फायनान्सच्या (आरएचएफएल) माजी प्रमुख अधिकाऱ्यांसह इतर २४ संस्थांवर बंदी घालण्यात आली. रिलायन्स होम फायनान्सवर सहा महिन्यांची बंदी घालण्यात आली असून, ६ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

सेबीने जारी केलेल्या २२२ पानांच्या अंतिम आदेशानुसार, अनिल अंबानी यांनी आरएचएफएल अधिकाऱ्यांच्या मदतीने पैशांची उधळपट्टी केल्याचे तपासात उघड झाले आहे. त्यांनी स्वत: निधीचा वापर केला. मात्र, हा निधी कर्ज म्हणून दिल्याचे भासवले.

**सेबीच्या आदेशाशी संबंधित काय घडले**

- निधीचा गैरवापर असणारी कर्जे बंद करण्याच्या आणि कॉर्पोरेट कर्जाचा नियमित आढावा घेण्याच्या सूचना संचालक मंडळाने दिल्या होत्या, परंतु कंपनीच्या व्यवस्थापनाचे दुर्लक्ष.
- सेबीने म्हटले आहे की, परिस्थिती पाहता आरएचएफएलला फसवणुकीत गुंतलेल्या व्यक्तींइतकेच जबाबदार धरले जाऊ नये. इतर संस्थांनी निधी वळवण्यास मदत केली.
- अनिल अंबानी यांना २५ कोटी रुपये, अमित बापना यांना २७ कोटी रुपये, रवींद्र सुधळकर यांना २६ कोटी रुपये आणि पिंकेश आर शाह यांना २१ कोटी रुपयांचा दंड.
- रिलायन्स युनिकॉर्न एंटरप्रायझेस, रिलायन्स एक्सचेंज नेक्स्ट आणि इतर कंपन्यांना निधीचा गैरवापर केल्याप्रकरणी प्रत्येकी २५ कोटी रुपयांचा दंड. (वृत्तसंस्था)

# दोन नक्षलवादी शरण

## १६ लाखांचे होते बक्षीस

**सुकमा, २३ ऑगस्ट**

सुरक्षा दलांवरील अनेक हल्ल्यांमध्ये सहभागी असलेल्या दोन जहाल नक्षलवाद्यांनी शुक्रवारी छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात पोलिसांपुढे शरणागती पत्करली. या दोघांवरही संयुक्तपणे १६ लाख रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले होते.

वरिष्ठ माओवादी नेत्यांच्या अतोनात अत्याचारांमुळे आणि दिशाभूल चळवळीमुळे आम्ही शस्त्र खाली ठेवण्याचा आणि शरणागती पत्करण्याचा निर्णय घेतला. नक्षलवादी चळवळ आता अमानवीय झालेली आहे, असे या दोन्ही नक्षल्यांनी पोलिस आणि सीआरपीएफच्या अधिकाऱ्यांपुढे शस्त्र खाली ठेवताना सांगितले.

राज्य सरकारच्या नक्षल निर्मूलन धोरणामुळे तसेच सुकमा पोलिसांच्या पुनर्वसन धोरणामुळे आम्ही प्रभावित झालो आहोत. आम्हाला नव्याने आयुष्य जगण्याची संधी मिळाली, असे ते म्हणाले. मडकाम सना आणि मडकाम मुया अशी या नक्षल्यांची नावे असून, ते पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मीचे सदस्य होते. (वृत्तसंस्था)

# लाडक्या बहिणींना पूर्ण पैसे मिळणार

**मुंबई, २३ ऑगस्ट**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांच्या बँक खात्यात सरकारने जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे एकूण तीन हजार रुपये जमा केले. किमान शिल्लक आणि इतर शुल्कांच्या नावाखाली बँकांनी यातील पैसे कपात केले. त्यामुळे महिलांना या योजनेतील संपूर्ण पैसे मिळू शकले नाही. याबाबत प्राप्त तक्रारींची दखल घेत, राज्य सरकारने बँकांना कोणतीही शुल्क कपात न करण्याचा तसेच खात्यात जमा झालेली संपूर्ण रक्कम लाभार्थी महिलांना देण्याचा आदेश दिला आहे.

**शुल्क कपात न करण्याचा बँकांना आदेश**

आमच्या पैशातील बराचसा भाग बँकांनी किमान शिल्लक आणि इतर शुक्कांच्या नावाखाली कापला, अशा तक्रारी राज्यभरातून आल्या. राज्य सरकारने महिलांच्या अडचणींची दखल घेतली आणि महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी लगेच आवश्यक त्या सूचना बँकांना दिल्या.

तटकरे यांनी याबाबतची माहिती एक्स या समाज माध्यमावर दिली. लाडकी बहीण योजनेंतर्गत मिळालेला लाभ कोणत्याही कारणासाठी कपात करू नये, अशा सूचना सर्व बँकांना दिल्या. लाभार्थींचे कर्ज थकित असले तरी, लाडकी बहीण योजनेत मिळालेले पैसे त्या कर्जासाठी वजा करता येणार नाही. कोणत्याही कारणास्तव लाभार्थींचे खाते गोठवण्यात आले असेल, तर ते पूर्ववत करण्यात यावे, असा निर्देश त्यांनी बँकांना दिला. (वृत्तसंस्था)

# गुप्त माहिती काढण्यासाठी मला झेड प्लस सुरक्षा

## शरद पवार यांनी व्यक्त केला संशय

**मुंबई, २३ ऑगस्ट**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक अवघ्या दोन महिन्यांवर आली असल्याने, माझ्याबाबतची काही खास आणि गुप्त माहिती काढण्यासाठीच केंद्र सरकारकडून मला झेड प्लस सुरक्षा देण्यात आली असावी, असा संशय ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केला.

केंद्र सरकारने बुधवारी शरद पवार यांना गृह मंत्रालयाच्या अहवालाच्या आधारावर सर्वोच्च दर्जाची झेड प्लस सुरक्षा उपलब्ध करून दिली होती.

तुमच्या सुरक्षेत इतकी वाढ का करण्यात आली, असे पत्रकारांनी विचारले असता, यामागचे नेमके कारण मला देखील माहिती नाही. गृह मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी मला



कळविले की, तीन नेत्यांना झेड प्लस दर्जाची सुरक्षा देण्याचा आदेश केंद्राने दिला असून, त्यात तुमचाही समावेश आहे. यातील अन्य दोघे कोण आहेत, असे मी विचारले. त्यावर अधिकाऱ्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनादेखील सर्वोच्च सुरक्षा प्रदान करण्यात आली असल्याची माहिती दिल्याचे पवार म्हणाले. महाराष्ट्रात आता विधानसभा निवडणूक होणार असल्याने कदाचित माझ्या निवडणूक रणनीतीची माहिती प्राप्त करण्यासाठी मोदी सरकारने ही विशेष व्यवस्था केली असावी, असा चिमटा शरद पवार यांनी काढला. (वृत्तसंस्था)

# नेपाळमध्ये नदीत बस कोसळली; २७ ठार

## जळगावच्या १६ जणांचा समावेश; १४ जखमी

**नवी दिल्ली, २३ ऑगस्ट**

भारतीय प्रवासी असलेली बस नेपाळच्या मर्स्यांगडी नदीत कोसळून जळगावच्या १६ प्रवाशांसह २७ लोकांचा मृत्यू झाला. हे सर्व जण भारतीय आहेत. या अपघातात १४ जण जखमी झालेत. हे सर्व प्रवासी महाराष्ट्रातील जळगावचे आहेत. नेपाळ पोलिसांनी या घटनेला दुजोरा दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेवर दु:ख व्यक्त केले आहे.

पोखरा येथील माझेरी रिसॉर्टमध्ये थांबलेल्या भारतीय प्रवाशांना घेऊन ही बस काठमांडूकडे रवाना झाली होती. या बसमध्ये ४० भारतीय प्रवासी होते. नेपाळमधील तनहू जिल्ह्यातील अबुखैरेनी परिसरातील मर्स्यांगडी नदीत ही बस कोसळली. स्थानिक पोलिस व बचाव पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले. मदत आणि बचाव कार्यात २७ मृतदेह बाहेर काढण्यात आले असून, १६ जखमी प्रवाशांना तत्काळ स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले, अशी माहिती पोलिस उपअधीक्षक दीपकुमार राय यांनी माहिती दिली.



बस नदीत कोसळल्यानंतर मदत व बचाव कार्य करताना नेपाळचे पोलिस अधिकारी व अन्य नागरिक

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रशासनाने आवश्यक त्या सर्व सूचना केल्या. पीडित कुटुंबांना शक्य ती सर्व मदत केली जात आहे. बस नदीत नेमकी कशी कोसळली, याचा शोध घेण्यासाठी प्रशासन व बचाव पथक या दुर्घटनेच्या सर्व परिस्थितीचा सखोल तपास करीत आहे. (वृत्तसंस्था)

> नेपाळमधील दुर्घटनेत महाराष्ट्रातील काही भाविकांचा मृत्यू झाला. हे भाविक जळगाव जिल्ह्यातील असल्याचे कळले. राज्य सरकारने तत्काळ नेपाळ दूतावासाशी संपर्क साधला आहे. जखमींना तातडीने वैद्यकीय सुविधा देण्यासाठी अधिकारी संपर्कात आहेत. नेपाळ सरकारशी समन्वय साधून सर्व पार्थिव आणण्यासाठी आम्ही उत्तरप्रदेश सरकारच्या संपर्कात आहोत. मंत्री गिरीश महाजन आणि अनिल पाटील हे सुद्धा संपर्कात आहेत.
>
> **देवेंद्र फडणवीस**, उपमुख्यमंत्री

**ताज्या घडामोडी** क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या किंवा** ९८२३०४८०६६ व्हॉट्सअॅप क्रमांकावर संपर्क साधा.

सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**

## अंतरंग

३ पॅरासिटामॉलसह १५६ धोकादायक औषधांवर बंदी
४ जम्मू-काश्मिरातील अभद्र आघाडी (अग्रलेख)
१० नीरजला डायमंड लीगमध्ये रौप्यपदक
१२ अंतराळातील वाढत्या कचऱ्यावर राष्ट्रपतींकडून चिंता

# सोयाबीन खरेदीदारांकडून अडत्याची एक कोटीने फसवणूक

## दिल्लीच्या व्यापाऱ्यासह तिघांवर गुन्हा

**खामगाव, २३ ऑगस्ट**

सोयाबीन खरेदीदारांनी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमधून खरेदी केलेल्या सोयबीनची बाकी असलेली रक्कम न देता एका अडत व्यावसायिकाची तब्बल १ कोटी ११ लाख ८२ हजार ८४५ रुपयांनी फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमधील अडत व्यावसायिक ममता ललित राठी यांच्यातर्फे पती ललित बद्रीनाथ राठी (४३) यांनी शहर पोलिस स्टेशनला तक्रार दिली आहे. १८ जानेवारी २०२४ ते फेब्रुवारी २०२४ दरम्यान त्यांच्याकडून दिनेश रामपाल शेरावत (नमन ट्रेडर्स रा. नवी दिल्ली), केशव दीपक मित्तल व अजित मोहनलाल दुबे यांनी एकूण २ कोटी ३५ लाख ८० हजार ७२ रुपयांचे सोयाबीन खरेदी केले.

ठरलेल्या कराराप्रमाणे त्यांनी सोयाबीनचे १ कोटी ११ लाख ८४५ रुपये अदा केले. मात्र, उर्वरित रक्कम देण्यासाठी टाळाटाळ करण्यात आली. राठी यांनी बाकी असलेली रक्कम देण्याबाबत अनेक वेळा या तिघांना संपर्क साधला. त्यांनी आज देतो, उद्या देतो, अशा थापा मारल्या. आजपर्यंत उर्वरित रक्कम न देता राठी यांची तब्बल १ कोटी ११ लाख ८२ हजार ८४५ रुपयांनी फसवणूक केली.

प्राप्त तक्रारीनुसार पोलिसांनी दिनेश रामपाल शेरावत, केशव दीपक मित्तल व अजित मोहनलाल दुबे या तिघांविरुद्ध भादंविच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. (तभा वृत्तसेवा)

# गोविंद मोहन यांनी स्वीकारली गृहसचिव पदाची सूत्रे

**नवी दिल्ली, २३ ऑगस्ट**

१९८९ च्या सिक्कीम कॅडरचे आयएएस अधिकारी गोविंद मोहन यांनी आज केंद्रीय गृहसचिव पदाची सूत्रे स्वीकारली. मावळते गृहसचिव अजयकुमार भल्ला यांच्याकडून गोविंद मोहन यांनी या पदाची सूत्रे स्वीकारली.

भल्ला प्रदीर्घ काळ म्हणजे पाच वर्षे गृहसचिव होते. गृहसचिव म्हणून सलग चार वेळा भल्ला यांना मुदतवाढ मिळाली. मूळ उत्तरप्रदेशचे असलेले गोविंद मोहन २०१७ पासून केंद्रात प्रतिनियुक्तीवर आहेत. सप्टेंबर २०१८ पर्यंत ते गृहमंत्रालयात संयुक्त सचिव होते. सप्टेंबर २०१८ ते सप्टेंबर २०२१ पर्यंत अतिरिक्त सचिव म्हणून त्यांनी काम केले. (वृत्तसंस्था)

# राम मंदिराला वर्षभरात ३६३ कोटींहून अधिक देणग्या

## न्यासाच्या बैठकीतून समोर आली माहिती

**अयोध्या, २३ ऑगस्ट**

रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या बैठकीत राम मंदिरातील अर्पण आणि खर्चाचा हिशेब सादर करण्यात आला. रामललाला १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या वर्षभराच्या कालावधीत ३६३ कोटी ३४ लाख रुपये देणग्या मिळाल्या आहेत.

रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टला विविध माध्यमातून ही रक्कम मिळाली. परदेशात राहणाऱ्या



रामभक्तांनी १० कोटी ४३ लाख रुपये अर्पण केले, तर एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत बँकेत जमा केलेल्या २६०० कोटींच्या ठेवींवर व्याज म्हणून २०४ कोटी रुपये मिळाले. ५ ऑगस्ट २०२० रोजी राम मंदिराच्या भूमिपूजनानंतर रामललाला १३ क्विंटल चांदी आणि २० किलो सोने मिळाले आहे.

ट्रस्टने सर्व शिल्पकारांना प्रत्येकी ७५ लाख रुपये दिले. राम मंदिराच्या पहिल्या मजल्यावर राम दरबाराची संगमरवरी मूर्ती बनवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यापूर्वी ट्रस्टने राम दरबाराची मूर्ती विशिष्ट प्रकारच्या मिश्र धातूपासून बनवण्याचा निर्णय घेतला होता. आता ही मूर्ती तयार आहे. राम दरबाराची संगमरवरी मूर्ती अचल मूर्ती म्हणून तयार केली जात आहे. (वृत्तसंस्था)

# आमदार लोणीकरांनी कधीही जातीपातीचे राजकारण केले नाही, जातीचे राजकारण करणाऱ्यांपासून सावध राहण्याची गरज - राहूल लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या माध्यमातून मंठा परतूर नेर सेवली विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गाव वाडी वस्ती तांब्याच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील असून आमदार लोणीकरांच्या माध्यमातून अनेक गावांचा कायापालट झाला आहे लोणीकर कुटुंबीयांनी कधीही जातीपातीचे राजकारण केले नाही करणारही नाही परंतु अनेक लोक केवळ जातीपातीचे राजकारण करून मते मिळवण्याचा प्रयत्न करतात परंतु प्रत्यक्षात गावाच्या विकासासाठी ज्या समाजाच्या नावावर मते घेतात त्या समाजाच्या विकासासाठी कुठलीही



ठोस भूमिका कधी घेत नाहीत किंवा कुठलेही काम सामाजिक भावनेच्या उद्देशाने करत नाहीत त्यामुळे अशा लोकांपासून सर्वांनी सावध राहणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे नवनिर्वाचित प्रदेश सचिव श्री राहुल लोणीकर यांनी आज केले.

मंठा तालुक्यातील लिंबोना येथे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रयत्नातून मंजूर करण्यात आलेल्या तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत वसंतराव नाईक सामाजिक सभागृह भूमिपूजन (१५ लक्ष रु) कार्यक्रम प्रसंगी राहुल लोणीकर बोलत होते यावेळी मंचावर माजी संचालक विठ्ठलराव काळे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष विलास घोडके, भाजपा जालना जिल्हा उपाध्यक्ष कैलास चव्हाण, सरपंच परिषदेचे मंठा तालुका अध्यक्ष आनंद जाधव, माळकिनीचे सरपंच जगदीश जाधव, माऊली गोंडगे, सावरगाव वायाळ चे सरपंच सोपानराव वायाळ, रमेश वायाळ, लिंबोना गावचे सरपंच रामेश्वर इंगळे, उपसरपंच भरत राठोड, बाळासाहेब इंगळे, जानकिराम चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती

यावेळी पुढे बोलताना श्री राहुल लोणीकर म्हणाले की प्रत्येक गाव वाडी वस्ती तांड्याच्या विकासासाठी आमदार बबनराव लोणीकर सातत्याने प्रयत्नशील असतात प्रत्येक गावाला पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करून परतुर व मंठा तालुक्यासाठी वॉटर ग्रीड सारखी महत्त्वपूर्ण योजना मंजूर करण्यात आली आहे त्या योजनेच्या माध्यमातून लवकरच उर्वरित गावांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळणार आहे आमदार लोणीकरांच्या कार्यकाळात प्रत्येक गाव वाडी वस्ती तांड्याला डांबरीकरणाच्या पक्क्या रस्त्याने जोडण्यात आले आहे त्यामुळे प्रत्येक गावाला दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत असेही यावेळी राहुल लोणीकर म्हणाले सर्वसामान्य जनतेचा विजेचा प्रश्न सुटावा यासाठी आमदार लोणीकरांच्या माध्यमातून विजेचे जाळे निर्माण करण्यात आले आहे आता प्रत्येक गावामध्ये कृषी पंपाची वीज वेगळी व गावठाणची वीज वेगळी अशा प्रकारची तरतूद करण्यात आली असून प्रत्येक गावाला स्वतंत्र ट्रांसफार्मर मिळणार आहे शेतीसाठी व घरगुती वापरासाठी मुबलक वीज मिळावी यासाठी आमदार लोणीकर सातत्याने प्रयत्नशील असतात लिंबोना गावासाठी देखील एक १०० चा ट्रांसफार्मर मंजूर करण्यात आला असून लवकरच त्याचे काम पूर्ण होईल असा विश्वास देखील यावेळी राहुल लोणीकर यांनी उपस्थित नागरिकांना दिला.

आपल्या गावाच्या विकासासाठी तालुक्याच्या विकासासाठी आपण सर्वांनी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये जातीपातीचे राजकारण करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवत सर्व जाती धर्मांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या लोणीकरांच्या पाठीशी उभे राहावे अशी विनंती देखील यावेळी राहुल लोणीकर यांनी केली यावेळी उद्धवराव इंगळे, दत्तराव खराबे, बाबासाहेब राठोड, सरपंच रामेश्वर इंगळे, उपसरपंच भरत राठोड, शिवाजीराव भोसले, नारायण इंगळे, बाबासाहेब राठोड, भिका चव्हाण, जानकीराम राठोड, विश्वनाथ राठोड, विष्णू राठोड, अशोक राठोड, राजू सिताराम चव्हाण, भारत चव्हाण, अशोक काटकर, सचिन पवार, अश्रूबा इंगळे, आबासाहेब इंगळे, गुलाबराव राठोड, रामेश्वर राठोड, महादेव राठोड, संतोष राठोड, शरद चव्हाण, राजू वसाराम राठोड यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते

## संक्षिप्त

### 'आफ्टर ऑपरेशन लंडन कॅफे' साठी मराठी आणि साऊथ कलाकारांची तगडी टीम एकत्र

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**




काही महिन्यांपूर्वी 'आफ्टर ऑपरेशन लंडन कॅफे' या मराठी सिनेमाच्या पोस्टरने चाहत्यांच्या मनात प्रचंड उत्सुकता निर्माण केली होती. या सिनेमाचा लूक पाहून मराठी प्रेक्षकांमध्ये चर्चेचा विषय बनला होता की हा सिनेमा कधी प्रदर्शित होणार ? विशेष म्हणजे, मराठी आणि कन्नडा सिनेमाचं कोलॅबोरेशन म्हणजे 'आफ्टर ऑपरेशन लंडन कॅफे' हा सिनेमा. दिपक पांडुरंग राणे, विजय कुमार शेट्टी हवराल, आणि रमेश कोठारी निर्मित 'आफ्टर ऑपरेशन लंडन कॅफे' या बहुप्रतीक्षित सिनेमाचा टीझर नुकताच प्रदर्शित झाला असून त्यात दाखवलेल्या सीन्सनी, कलाकारांच्या अभिनयाची झलक, थरारक ऍक्शन सिक्केन्सेसनी तसेच प्रभावी बॅकग्राऊंड म्युझिकमुळे प्रेक्षकांच्या अपेक्षा आणखी उंचावल्या आहेत. हा सिनेमा काहीतरी वेगळा आणि अधिक रोमांचक दिसतोय. मराठी सिनेसृष्टीने आजवर विविध विषय सखोल विचार करून हाताळले आहेत, मात्र हा सिनेमा एका नव्या दृष्टिकोनातून आणि वेगळ्या शैलीतून सादर करण्यात आलेला आहे. आता त्यांनी एक नवं पाऊल पुढे टाकत एक नवीन विषय हाताळला आहे.

### वडीलांच्या तेरवीनिमीत्त अनाथ आश्रमात अन्नदान



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

वडिलांकडून मिळालेला समाजसेवेचा वारसा जोपासत त्यांच्या स्मरणार्थ तेरवीच्या कार्यक्रमानिमित्त सामाजिक कार्यकर्ते योगेश नागरे यांनी अनाथ आश्रमात अन्नदान वाटप केले.

सेवानिवृत्त मुख्याध्यापक विश्वनाथ नागरे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या तेरवीच्या कार्यक्रमानिमित्त दिव्यांग , अनाथ बालकांना मिष्टान्न वितरित करून सामाजिक दायित्व जोपासण्याचा अल्पसा प्रयत्न नागरे कुटुंबीयांकडून करण्यात आला. याप्रसंगी शिक्षणाधिकारी सिद्धेश्वर काळुसे, प्रकाश जायभाये, सुहास सहाने, अभिषेक काबलिये आदींची उपस्थिती होती.

### बाबासाहेब बोरसे यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड



**तभा वृत्तसेवा**
**माहोरा/प्रतिनिधी**

जाफ्राबाद तालुक्यातील माहोरा येथील ग्रामसंसद कार्यालयात आज दि.२१ ऑगस्ट रोजी सरपंच गजानन पाटील लहाने यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंच पदाची निवडणूक प्रक्रिया पार पडली. यावेळी निर्वाचण अधिकारी एस.टी. गारोळे , ग्रामविकास अधिकारी रावसाहेब दांडगे , तलाठी अभय देशपांडे यांच्या उपस्थित ग्रामसंसद दालनामध्ये उपसरपंच पदाची निवडूक घेण्यात आली. माहोरा ग्रामसंसद मध्ये एकूण १२ सदस्य असून पैकी बाबासाहेब दादाराव बोरसे यांनी सर्वानुमती अर्ज भरल्यामुळे यांची निर्वाचन अधिकारी एस. टी . गारोळे , ग्रामविकास अधिकारी रावसाहेब दांडगे , तलाठी अभय देशपांडे आदिंच्या उपस्थितीत उपसरंपच पदाची निवडणूक प्रक्रिया पार पडली . आणि बाबासाहेब दादाराव बोरसे यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी माजी उपसरपंच सय्यद हबीब स . कमाल , ग्रा. प . सदस्य प्रभाकरराव शहागडकर , सौ . संगिता भानुदास बोर्डे , सौ . सुमनबाई चंदु सिरसाठ , सौ . उमाताई सुभाष लहाने , भास्कर सिताराम सोनवणे , सौ . कविता कैलास लहाने , हर्षल अशोक जाधव , सौ . जिजाबाई सुखदेव साबळे , सय्यद मालनबी मुन्सी , आदिंसह भाजपा जेष्ठ नेते भगवानराव पाटील लहाने , शिवसेना ( उ . बा . ठा ) गटाचे उपजिल्हा प्रमुख रमेश पाटील गव्हाड , शिवसेना ता . प्रमुख कुंडलीक पा . मुठ्ठे , सुरेश कुमार बोरसे शिवसेना मा . ता . प्रमुख , राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे ( शरद पवार गटाचे ) ता . प्रमुख रामधन पा . कळंबे , सुरेश गवळी ता . अध्यक्ष कॉंग्रेस , सुभाष पा . लहाने , गजानन पा . साळोक , प्रदिप बोरसे , दादाराव पा . जंजाळ , केशव मकवाने , विनोद बोरसे , नंदकुमार बोर्डे , पुंजाराम मुठ्ठे , विलास पा . लहाने , मुस्ताफा सय्यद , सय्यद रशीद , अंकुश पा . गाढे , गोविंदा गाढे , सोमनाथ चौधरी , लक्ष्मण वाघ , गणेश गायकवाड , पत्रकार बाळासाहेब गव्हले , गणेश कासोद , राजु गौरकर आदिसह ग्रामस्थांनी नवनिर्वाचित उपसरपंच बाबासाहेब बोरसे यांचा सत्कार करून अभिनंदन केले .

## अर्जुनराव खोतकरांचा पाठपुरावा अन् मयत शेतकरी रावसाहेब जाधव यांच्या कुटुंबीयांना गोपीनाथ मुंडे अपघात विमा मंजूर!

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना विधानसभा मतदारसंघातील माळशेंद्रा तालुका जिल्हा जालना येथील रावसाहेब रघुनाथ जाधव या शेतकऱ्याचे पंढरपूर येथे विहिरीत पडून अपघातीअपघाती निधन झाले होते .सदर शेतकरी पंढरपूर येथे एका शेतकऱ्याकडे कामाला होता. या शेतकऱ्याच्या घरची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे त्यांच्या पत्नी श्रीमती अनिता रावसाहेब जाधव यांना माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी गोपीनाथ मुंडे अपघात योजनेअंतर्गत कृषी विभागाकडे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना



केल्या होत्या, त्याप्रमाणे त्यांनी अपघात विमा संदर्भात प्रस्ताव दाखल केला होता. मा.खोतकर यांनी संबंधित अधिकाऱ्याला तात्काळ यासंदर्भात कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते.व तात्काळ महिलेला गोपीनाथ मुंडे अपघात योजने अंतर्गत लाभ मिळून द्यावा अशा स्वरूपाच्या केल्या सुचना केल्या होत्या.त्याप्रमाणे सदर मयत शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना दोन लक्ष रुपये गोपीनाथ मुंडे अपघात विमा मंजूर करण्यात आला. असून या विमा मदतीचा धनादेश त्यांच्या नावे बँकेत खात्यात जमा करण्यात आला. मा. खोतकर यांच्या सहकार्यामुळे विमा मंजूर झाल्यामुळे मयतांच्या कुटुंबियांनी आज दिनांक २२ ऑगस्ट २०२४ रोजी दर्शना बंगला भाग्यनगर येथे मयतांची पत्नी श्रीमती अनिता रावसाहेब जाधव , वडील रघुनाथ जाधव,आई प्रयागबाई जाधव, मुलगी कुमारी पूजा रावसाहेब जाधव ,मुलगा बाळू रावसाहेब जाधव, यांनी शिवसेना उपनेते तथा माजी मंत्री अर्जुनरावजी खोतकर यांची भेट घेतली व समाधान व्यक्त केले.यावेळी त्यांच्या गावातील ज्येष्ठ शिवसेनेचे कार्यकर्ते शिवाजीराव जाधव व उपसरपंच बाळासाहेब जाधव व गणपत धोत्रे उपस्थित होते.

## नेर येथे कार्यकर्ता संवाद दौरा व शाखेचे उदघाटन संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधि**

परतूर-मंठा(नेर-शेवली) मतदार संघातील नेर ता.जि.जालना येथे युवक जिल्हाध्यक्ष कपिल भैय्या आकात यांनी शाखेचे उद्घाटन व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा संवाद दौरा घेतला.यावेळी कार्यक्रमाला श्री.पंकज नाना बोराडे,ह.भ.प.बालासाहेब महाराज औटी,माजी सभापती प्रल्हादराव खेडेकर,जि.बँ.चे संचालक कल्याण बापू खरात,जिल्हा उपाध्यक्ष विजय राठोड,प्रा.रंगनाथ खेडेकर,कल्याणराव देशमुख,बालासाहेब उफाड,शाखाअध्यक्ष अमोल सहाने,उपाध्यक्ष श्रीकांत खेडेकर,सचिव राहुल राठोड,कोषाध्यक्ष रंजीत पवार,सहसचिव कुंदन राठोड,शिवाजी घाडगे,सोपानराव कुळवंत,नारायण उफाड,सर्जेराव सहाने,संदीप राठोड,दिपक खेडेकर,विलास आढे,सय्यद हमीद भाई,पांडुरंग भुतेकर,अंकुश चव्हाण,सुरेश चव्हाण,नसीर भाई,शेषेराव हिवाळे व सर्कल मधील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दीपक रणनवरे यांच्या आमरण उपोषणाला शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू पाचफुले यांनी दिली भेट

### अर्जुनराव खोतकरांच्या माध्यमातून मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करणार-पाचफुले

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करा या मागणीसाठी गेल्या सात दिवसापासून गांधी चमण येथे दीपक रणनवरे अमरण उपोषणाला बसलेले आहे त्या उपोषणाला दीपक रणनवरे यांची भेट घेऊन माजी मंत्री अर्जुना खोतकर यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे प्रतिपादन शिवसेनेचे शहर प्रमुख



विष्णू भाऊ पाचपुले यांनी सांगितला आहे यावेळी अखिल भारतीय बहुभाषिक ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष सुरेश मुळे श्रीकांत जोशी राम खांडेभराड पांडुरंग खैरे आदींची उपस्थिती होती



**तभा वृत्तसेवा**

**जालना : शहरातील मोदीखाना येथे श्रीच्या आगमना निमित्त बजरंग गणेश मंडळातर्फे जय्यत तयारी केली जात आहे. मंडपाच्या कामाचे भूमिपूजन आ. कैलास गोरंटयाल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंडळाचे पदाधिकारी महेंद्र लाचूरिये, मनोज जोशी, पंकज अग्रवाल,संदीप दहाले, मोहन ठाकुर,सौरभ गौड़, घनश्याम भारूका, अशोक अग्रवाल,आनंद काळे, बबलू डहाले, मनोज ठाकुर विजय हरदेकर, दत्ता दहले, आसाराम भारुका, पूनम ठाकुर, प्रशांत हरदेकर ,सतीश बिडकर आदींची उपस्थिती होती. ( छाया : दीपक इगेवार )**

## शबरी योजनेतून घरकुल मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार -मा.सरपंच अविनाश राठोड

**तभा वृत्तसेवा**
**तळणी/प्रतिनिधी**



मंठा तालुक्यातील नायगाव येथील वंचित असलेल्या आदिवासी कुटुंबातील सदस्यांना माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांच्या सहकार्याने शबरी योजनेतून घरकुल मिळून देण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे नायगावचे मा.सरपंच अविनाश राठोड प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

नायगाव हे मागासवर्गीय वस्तीचे गाव आहे.गावांमध्ये बंजारा, मराठा, वंजारी ,बौद्ध त्याच प्रमाणे जवळपास १५० ते १७० आदिवासी कुटुंब वास्तवित आहेत.गरीब असलेल्या ह्या लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आणि मोल मजुरी करून उदरनिर्वाह करतात. या लोकांची घरे पूर्वी किंवा पहिले मातीचे,कुडाची, लाकूड, आणि दगडाची होती. २०१७ ते २३ पर्यंत केंद्र शासनाने या लोकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी निवारा म्हणून हक्काचे घर म्हणून प्रधानमंत्री आवास योजनेतून जवळपास ७० ते ८० घरकुले मिळाली आणि ती सर्व पूर्ण झालेली आहेत.हे घर विटा, लोखंडी,सिमेंटचे झाले असून पक्की आहेत.त्यात हे लोक सुखमय जीवन जगत आहेत. जे कुटुंब विभक्त झाले आहेत किंवा वंचित राहिले आहेत. त्या सर्व कुटुंबातील सदस्यांना शबरी ही योजना उपयुक्त आहे. घरकुल नसलेल्या गावातील आदिवासी कुटुंबातील जास्तीत जास्त सदस्यांनी ग्रामपंचायतला ह्या योजनेचे अर्ज करावे असे आव्हान राठोड यांनी केले आहे.पुढे त्यांनी ज्या सदस्यांनी ग्रामपंचायतला अर्ज केलेला आहे. ते संपूर्ण अर्ज पंचायत समिती मार्फत आणि आमदार बबनरावजी लोणीकर यांचे शिफारस पत्र लावून ते प्रकल्प संचालक,आदिवासी विभाग संभाजीनगर येथील कार्यालयास जमा करून पात्र कसे होतील त्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे राठोड यांनी शेवटी सांगितले. या योजनेसाठी अर्जदाराने विहित नमुन्याचा अर्ज, आधार कार्ड, बँकेचे पासबुक, पास फोटो, आणि नमुना नंबर आठ इतर कागदपत्रे ग्रामपंचायत दाखल करावीत.

## तीस फरार आरोपींवर पोलिसांची कारवाई; अनेकांचे धाबे दणाणले



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन | प्रतिनिधी**

भोकरदन येथील दबंग पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी कारवाईचा हत्यार उपसल्याने अनेकांचे धाबे दणाणले आहे, बुधवारी बिडवे यांच्या नेतृत्वाखाली फरार असलेल्या ३० आरोपींवर कारवाई केली. यामध्ये आठ आरोपींना न्यायालय समोर हजर केले असता २२ आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाई केली.

भोकरदन पोलिसांनी बुधवार ( २१) रोजी विशेष मोहीम राबवुन न्यायालयात हजर न राहणाऱ्या नॉन बेलेबल वारंट मधील ०८ आरोपी ज्यामध्ये भारतीय दंड सहिंता कलम ३२४ मधील एक वर्षापासुन पाहीजे असलेला ०१ आरोपी होता. यांना अटक करुन न्यायालयात हजर केले. भारतीय हत्यार कायदा मधील ०१ आरोपी, अवैध वाळु वाहतुक करणारे ११, प्रतिबंधीत गुटख्याची वाहतुक करणारे ०३, अन्न व भेसळ अत्यावश्यक वस्तु कायदा मधील ०२, गांजा लागवड करणारे ०४, भारतीय दंड सहींता कलम ३७६ मधील ०१ अशा आरोपीना पोलीस ठाण्यात हजर करुन त्यांच्यवावर भारतीय नागरीक सुरक्षा सहींता २०२३ कलम १२६ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई केले. आरोपीनी अशा प्रकारचे गुन्हे करु नये याकरीता त्यांना अप्पर पोलीस अधिक्षक यांच्या समोर हजर करुन सदर आरोपीकडुन चांगल्या वर्तणुकीचा दोन जामीनदारासह हमी पत्र घेण्यात आले. वाळु वाहतुक करणारा एक हायवा ( क्रमांक एमएच २८/३-/५९७९) मध्ये क्षमतेपेक्षा जास्त वाळु असल्याने सदर हायवाचे वजन करण्यात आले. या प्रकरणी आरटीओंना कळवुन त्यांच्या मार्फत हायवाला ज्यादा वजनाबाबत ४३ हजार ५०० रुपये दंड ठोठावण्यात आला आहे. सदरची कामगिरी उपविभागीय पोलीस अधिकारी गणपत दराडे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण बिडवे, पोलिस उपनिरीक्षक सागर शिंदे, ग्रेड पोलिस उपनिरीक्षक बी. टी. सहाणे, सहय्यक फौजदार भास्कर जाधव, दत्ता राऊत, सुदर्शन मोहीते यांनी केली.

## डॉ.बद्रीप्रसाद घुगे यांना वंचितने ओबीसीतून उमेदवारी द्यावी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना परभणी या मतदारसंघात ओबीसी मतदार मोठ्या प्रमाणात असल्याने वंचित बहुजन आघाडी अध्यक्ष ड. बाळासाहेब आंबेडकर यांनी डॉक्टर बद्रीप्रसाद घुगे यांना ओबीसीतून उमेदवारी द्यावी अशी मागणी विविध संघटना व डॉक्टर संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.



वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. बाळासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्रातील २८८ पैकी १०० ओबीसीतील उमेदवार देणार अशी घोषणा केली आहे. जिंतुर, जालना, सेलू, मतदासंघात ओबीसी उमेदवार देण्यात यावी व जालना, परभणी, जिंतुर, सेलू या भागात अतिशय लोकप्रिय असलेले डॉ. बद्रीप्रसाद घुगे यांना उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी जिंतुर व सेलू या भागातील ओबीसी समाज, सामाजिक संघटना व जिंतुर मधील डॉक्टर्स कमिटीच्या वतीने मागणी करण्यात आली आहे.

डॉ. घुगे यांचे सामजिक, शैक्षणिक व वैद्यकिय विभागात चांगले नाव आहे. डॉ. हरिप्रसाद घुगे यांनी वंचित बहुजन आघाडीच्या आरक्षण बचाव यात्रेत जालना व परभणी भागात रुग्णवाहिका व तज्ञ डॉक्टर्स टीमसह वैद्यकिय सेवा दिली होती. जालना व जिंतुर मध्ये तीन वर्षापासुन त्यांची मोफत रुग्णसेवा सुरू आहे. डॉ. घुगे यांना उमेदवारी दिल्यास प्रचंड मतांनी विजयी होतील असा विश्वास ओबीसी समाज, विविध सामाजिक संघटना, जालना, जिंतुर मधील डॉक्टर्स कमिटीच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. डॉ. हरिप्रसाद घुगे यांना उमेदवारी देण्यात यावी यासाठी लवकरच एक शिष्ठमंडळ वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. बाळासाहेब आंबेडकर यांना भेटणार असल्याचे ही सांगण्यात आले आहे.

## अग्रलेख...

# नृशंस बलात्कार प्रकरणातील अनुत्तरित प्रश्न

कोलकाता येथील शिकाऊ डॉक्टर तरुणीच्या मृत्यूला रानटी संजय रॉय हाच जबाबदार होता की हे सामूहिक बलात्कार आणि खुनाचे प्रकरण आहे, हे सिद्ध झाल्यानंतर संपूर्ण कथा आणि सिद्धांत बदलून जाईल. एकूण प्रकरणाला मानवी अवयवांच्या तस्करीचा कोन आहे का, हेही तपासावे लागणार आहे. या संदर्भातील सर्वोच्च न्यायालयाच्या ताशेऱ्यांनंतर तर ममता बॅनर्जी तसेच पोलिस यंत्रणेची विश्वासार्हता धोक्यात आली. कॉल डिटेल रेकॉर्डनुसार, ९ तारखेला सकाळी ६ वाजता आर. जी. कार हॉस्पिटलमधून प्राचार्य डॉ. संदीप घोष यांच्या मोबाईलवर पहिला कॉल आला. फोन करणारा हॉस्पिटलचा कर्मचारी होता. सेमिनार हॉलमध्ये चेस्ट मेडिसिन विभागात तैनात शिकाऊ डॉक्टर तरुणीचा मृतदेह पडला असल्याची माहिती त्याने प्रथम डॉ. घोष यांना दिली. पुढील काही मिनिटांमध्ये तरुणीच्या मृतदेहाचा फोटो डॉ. घोष यांना व्हॉट्सअॅपवर पाठवण्यात आला. हॉस्पिटलपासून अर्ध्या तासाच्या अंतरावरील फुलबागान भागात डॉ. घोष राहतात. दुसरीकडे, सेमिनार हॉलमध्ये मृतदेह आढळल्याची बातमी आता संपूर्ण हॉस्पिटलमध्ये पसरली होती. सर्व डॉक्टर्स, कनिष्ठ डॉक्टर्स, प्रशिक्षणार्थी डॉक्टर्स, वैद्यकीय कर्मचारी आणि बाकीचे रुग्णालयातील कर्मचारीही सेमिनार हॉलमध्ये पोहोचले होते. डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांना गुन्हेगारीच्या घटनास्थळाचे महत्त्व माहीत असूनही प्रत्येक जण चपला, बूट आणि हातांच्या ठशांसह गुन्हेगारीच्या घटनास्थळाचे पुरावे जाणूनबुजून किंवा नकळत पुसून टाकत राहिले. मृतदेहाच्या आजूबाजूला क्वचितच असे काही असेल, ज्यावर जमावाने नकळत आपल्या खुणा सोडल्या नसतील. हाच तो क्षण होता, जेव्हा घटनेच्या पुराव्यांशी सर्वाधिक छेडछाड झाली होती. सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून घेतलेली या घटनेची दखल आणि शासकीय तसेच पोलिस यंत्रणांच्या पातळीवर राहिलेल्या त्रुटी लक्षात घेता या प्रकरणामागे बरेच काही दडले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचा वेध घेणे आवश्यक आहे. हॉस्पिटलमधील डॉक्टरांना नाडी आणि हृदयाच्या ठोक्यांवरून शिकाऊ डॉक्टर तरुणी जिवंत नाही, हे आधीच समजले होते. रुग्णालयातील सर्व महत्त्वाच्या व्यक्तींशी बोलून डॉ. घोष यांनीच पोलिसांना माहिती दिली. मृतदेह पाहिल्यापासून पोलिसांना माहिती देईपर्यंत तीन तास गेले. त्यानंतर दोन तासांनी हॉस्पिटलमधून शिकाऊ डॉक्टर तरुणीच्या आईला पहिल्यांदा बोलावण्यात आले. दुपारी १२ च्या सुमारास पालक रुग्णालयात पोहोचले. त्यानंतर सुमारे तीन तासांनी पालकांना या मुलीचा मृतदेह दाखवण्यात आला. तरुणीच्या आईने सांगितले की, त्यांच्या मुलीची पँट उघडी होती. संपूर्ण अंगावर फक्त कापडाचा तुकडा होता, हात तुटलेले होते, डोळ्यांतून आणि तोंडातून रक्त वाहत होते. मृतदेह पाहून आईने घटनास्थळी डॉक्टरांना ही आत्महत्या नसून हत्या असल्याचे सांगितले. यामुळेच काहीतरी लपवले जात असल्याचे जाणवू लागले. पहिला दिवस शिकाऊ डॉक्टर तरुणीच्या मृत्यूची संपूर्ण कहाणी हॉस्पिटलच्या चार भिंतींमध्ये गुंडाळण्यात होती. कोलकाता पोलिसांनीही सुरुवातीच्या काळात या प्रकरणाचा तपास, अपेक्षित पद्धतीने केला नाही. २४ तासांनंतर ही बातमी रुग्णालयाच्या चार भिंतींच्या पलीकडे पसरली आणि प्रथम कोलकाता आणि नंतर संपूर्ण देशात पोहोचली. त्यानंतर हॉस्पिटल प्रशासनाप्रमाणेच ममता सरकारकडे, कोलकाता पोलिसांकडे आणि कोलकाता पोलिस आयुक्तांकडे नजरा रोखल्या गेल्या. त्यानंतर कोलकाता उच्च न्यायालय प्रकाशात आले आणि हे प्रकरण घाईघाईने सीबीआयकडे सोपविण्यात आले. कोलकाता पोलिसांनी केलेल्या तपासानंतर 'सीबीआय' कशाचा तपास करीत आहे, असा प्रश्न एव्हाना उभा राहिला. ९ ऑगस्ट रोजी सकाळी ९.१५ च्या सुमारास सेमिनार हॉलमध्ये पोहोचलेल्या पोलिसांना शिकाऊ डॉक्टर तरुणीच्या मृतदेहाजवळ मोबाईल फोन, लॅपटॉप आणि ब्लूटूथ नेकबँड सापडला; मात्र तरुणीच्या मोबाईलला जोडल्यानंतर ते ब्लूटूथ अन्य कोणत्या तरी मोबाईलला जोडले असल्याचे आढळून आले. सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या फुटेजवरून तपास सुरू झाला. पोलिसांनी रुग्णालयाच्या तिसऱ्या मजल्यावर असलेल्या सेमिनार हॉलच्या प्रवेश आणि बाहेर जाणाऱ्या सर्व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली. सेमिनार हॉलमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा नव्हता; मात्र सेमिनार हॉलकडे जाणाऱ्या रस्त्यांवर काही कॅमेरे लावण्यात आले होते. चौकशीदरम्यान कॅमेऱ्यात कैद झालेली एक व्यक्ती वगळता रुग्णालयातील इतर सर्व कर्मचारी असल्याचे समोर आले आणि ती एकमेव व्यक्ती संजय रॉय होती. कोलकाता पोलिसांचा नागरी स्वयंसेवक असलेला रॉय हॉस्पिटलजवळील पोलिस बॅरेकमध्ये झोपलेला आढळला. पोलिसांनी बॅरेकमध्ये त्याचे कपडे जप्त केले. त्याने ते धुवून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता; मात्र त्याच्या बुटांवर रक्ताचे काही अंश आढळून आले. योगायोगाने सापडलेला ब्लूटूथ नेकबँड रॉयच्या मोबाईलला जोडला असता लगेच कनेक्ट झाला. रॉय हाच खुनी असल्याची खात्री कोलकाता पोलिसांना होती, त्याला अटक करण्यात आली.

एव्हाना शवविच्छेदन अहवालही समोर आला. गळा दाबून मृत्यू झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले. शिकाऊ डॉक्टर तरुणी आणि रॉय याचे डीएनए नमुने फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठवण्यात आले होते. दरम्यान, एका डॉक्टरने शिकाऊ डॉक्टर तरुणीच्या योनीत पांढरा द्रव असल्याचे विधान केले. एवढ्या मोठ्या प्रमाणात वीर्य आढळून आल्याचे कारण देत डॉक्टरांनी हे प्रकरण बलात्काराचे नसून सामूहिक बलात्काराचे असल्याचा दावा केला. डॉक्टरांच्या या वक्तव्यानंतर सर्वत्र सामूहिक बलात्काराची थेअरी सुरू झाली. शवविच्छेदनानंतर कोलकाता पोलिसांनी घाईघाईने शिकाऊ डॉक्टर तरुणीवर अंत्यसंस्कार केले. स्मशानभूमीत आधीपासून तीन मृतदेह अंत्यसंस्काराच्या प्रतीक्षेत असताना शिकाऊ डॉक्टर तरुणीच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याची पोलिसांनी घाई का केली? कोलकाता पोलिसांच्या या घाईमुळे शिकाऊ डॉक्टर तरुणीच्या मृत्यूच्या कटाला आणखी खतपाणी घातले गेले. शिकाऊ डॉक्टर तरुणीच्या मृत्यूनंतर आंदोलन सुरू असल्याने कायदा आणि सुव्यवस्था लक्षात घेऊन पोलिसांनी हे कृत्य केल्याचे समर्थन केले. रॉयला अटक केल्यानंतर पोलिसांनी गुन्ह्याची उकल झाल्याचा दावा करत हे प्रकरण बंद करण्याचे जवळपास ठरवले होते. तसे करून पोलिस हॉस्पिटलच्या प्राचार्यांसह बड्या लोकांच्या चुका लपवण्याचा प्रयत्न करत असल्याचे बोलले गेले. दरम्यान, रुग्णालयातील काही जुनी प्रकरणेही 'सोशल मीडिया'वर फिरू लागली. त्यात २००३ च्या सौमित्र विश्वास आत्महत्या प्रकरणाचाही समावेश होता. सौमित्रचीही हत्या करण्यात आली होती. हॉस्पिटलमध्ये सुरू असलेले सेक्स रॅकेट दडपण्यासाठी ही हत्या करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. भाजपाच्या एका खासदाराने आर. जी. कार हॉस्पिटलमधील मानवी अवयवांच्या तस्करीचा मुद्दा उपस्थित करून वेगळा दखलपात्र मुद्दा चर्चेत आणला. या अगणित गृहीतकांमध्ये 'सीबीआय'च्या तपासाची चर्चा आहे. सकाळी ६ वाजता मृतदेह दिसला; मग पुढील तीन तास पोलिसांना का कळवले गेले नाही. मृतदेह सापडल्यानंतर पाच तासांनंतर कुटुंबीयांना का कळवण्यात आले, कुटुंबीयांना ही आत्महत्या असल्याचे का सांगण्यात आले? सकाळी ७ वाजता मृतदेहाची बातमी मिळाल्यानंतर रुग्णालयाचे प्राचार्य डॉ. संदीप घोष यांनी सकाळी ९ पर्यंत काय केले. कोलकाता पोलिसांनी सुरुवातीला बोलावूनही प्राचार्य डॉ. घोष का गेले नाहीत? कोलकाता पोलिसांनी सुरुवातीला अनैसर्गिक मृत्यूची नोंद कोणाच्या सांगण्यावरून केली, असे अनेक प्रश्न आता समोर आले आहेत. मृतदेह पाहून हा बलात्कार आणि खुनाचा गुन्हा आहे, हे कोणीही सांगू शकत होते. कोलकाता उच्च न्यायालयानेही या मुद्यावर कोलकाता पोलिसांना खडसावले. हत्या झाली त्याच रुग्णालयात पोस्टमॉर्टेम का करण्यात आले, ते कोणाच्या सांगण्यावरून झाले, या प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्यासाठी 'सीबीआय'ने सुमारे २० जणांची चौकशी केली आहे.

## जीवन जिज्ञासा

प्राचार्य प्र. श्री. डोरले

# महाभारत ते भारत (२)

भारत देश आणि 'महाभारत' या महाकाव्याचा जन्मापासूनचा संबंध आहे. 'भारत' हे नाव शकुंतला आणि दुष्यंत यांचा पुत्र 'भरत' याच्या नावाने पडले आहे. द्वापारयुगात याच भरतवंशीयांचे राज्य हस्तिनापूर येथे होते. त्याचा एक समृद्ध इतिहास आहे. दिव्य-भव्य अशी महान परंपरा आहे. त्याचा इतिहास 'महाभारत' या काव्याच्या रूपाने महर्षी व्यासांनी सुमारे एक लक्ष श्लोकसंख्येत लिहिला आहे. रामायण आणि महाभारत ही दोन महाकाव्ये म्हणजे भारतवासीयांना कोणत्याही कालखंडात युगानुयुगे, जीवनतत्त्वज्ञान आणि व्यवहार या बाबतीत प्रखर मार्गदर्शन करणारे दीपस्तंभच आहेत. महर्षी वाल्मीकिंच्या दिव्यदर्शी आणि तप:पूत प्रज्ञेतून प्रकट झालेले 'रामायण' हे महाकाव्य म्हणजे मानवी जीवनात सहजपणे पार पाडाव्या लागणाऱ्या सर्व भूमिकांचा म्हणजे पुत्र, बंधू, सखा, मित्र, राजा, अजिंक्य योद्धा, पती, लोककल्याणकारी, प्रजावत्सल राजा या संबंधातील व्यवहारांचे, मर्यादांचे अंतिम आणि सर्वश्रेष्ठ आदर्श मापदंड प्रस्थापित करणारा मर्यादा पुरुषोत्तमाचे प्रतीक असलेल्या श्रीप्रभु रामचंद्रांचे महन्मंगल चरित्र! तसेच मानवी जीवनातील संस्कृतीतील शाश्वत जीवन मूल्यांचे पावित्र्याचे, मांगल्याचे माहेरघर असलेल्या मातृशक्तीला, आपल्या कामांधतेचे भक्ष्य करणाऱ्या त्रिलोकविजयी रावणशाहीला जी वृत्ती पुढे सुलतानशाहीच्या रूपाने अवतीर्ण झाली.

**व्यासोच्छिष्टं जगत सर्वम् :** 'रामायण' हे महाकाव्य त्रेतायुगातील आहे. 'महाभारत' हा ग्रंथ द्वापार युगातील आहे, त्रेतायुगाच्या तुलनेत द्वापार युगातील मानवी जीवन हे जीवनाच्या सर्वच क्षेत्रात अतिशय जटिल, गुंतागुंतीचे, अनेक समस्यांनी ग्रस्त आणि त्रस्त झाले होते. त्यामुळे महाभारतात येणारे अनेक प्रश्न हे बहुआयामी असे आहेत. त्याचा परिणाम म्हणजे महाभारत हे महाकाव्य एक लक्ष श्लोकांचे आहे तर रामायण हे चोवीस हजार श्लोकांचे आहे. त्यांची रचना करणारे महाकवी 'वाल्मीकि' आणि 'वेदव्यास' हे दोघेही दिव्यदृष्टिसंपन्न आहेत. स्वत: तपश्चर्येने प्राप्त अनेक सिद्धी त्यांच्याजवळ तर होत्याच; पण ब्रह्मदेवाने ती दिव्यदृष्टी आशीर्वाद रूपाने महर्षी वाल्मीकिंना देऊन रामायण ग्रंथ लिहिण्याचा आदेशच दिला होता. तोच प्रकार महाभारत ग्रंथाबाबत आहे. महर्षी व्यासांनी तर संजयला 'दूरदर्शना'ची दिव्य दृष्टी प्रदान करून अंध असलेल्या धृतराष्ट्राला संपूर्ण महाभारत युद्धाचा तपशील (त्या काळचा लाईव्ह कास्ट) (व्हिडीओ) ऐकविला. त्यामुळे हे दोन्ही ग्रंथ प्रासादिक आहेत. वरद ग्रंथ आहेत. म्हणूनच वर्तमान काळातही बदलत्या परिस्थितीच्या संदर्भात त्यातील अनेक क्षेत्रातील जीवनमूल्ये, जीवन सत्ये आजही 'वृत्तीरूपेण' आपल्याला अनुभवायला येतात म्हणूनच 'व्यासोच्छिष्टं जगत सर्वम्' असे म्हटले जाते, महाभारत म्हणजे अतिशय तरल, जटिल, भावनिक गुंतागुंतीच्या स्वरूपाच्या मानवी स्वभावाच्या विविध विकार, वासनांचे निखळ, पारदर्शी चित्रण करणारी एक अमर साहित्यकृती आहे.

रामायण आणि महाभारत हे दोन्ही ग्रंथ हिंदू धर्म, हिंदू संस्कृती परंपरा, इतिहास, तत्त्वज्ञान या विविध विषयांवर समग्र, तपशीलवार दिशाबोध करणारे मार्गदर्शन तर करतातच; पण तरीही या दोन ग्रंथांमध्ये एक सूक्ष्म फरक आहे आणि तो दोन युगातील बदलत्या परिस्थितीच्या संदर्भात आहे. दोन युगातील दिवसानुदिवस जीवनमूल्यांचा होणाऱ्या ऱ्हासाबद्दल आहे. व्यष्टी-समष्टी- धर्म-नीतिमूल्यांच्या ढासळत जाणाऱ्या गतिमानतेविषयीचा आहे. त्यातून व्यक्ती सुटलेली नाही, समाज सुटलेला नाही, राजयंत्रणा तर 'राजा: कालस्य कारणम्' या अराजकतेच्या भयावह उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे. राज्य लोभामुळे भाऊ भावाचा वैरी झाला आहे. अशा जीवनमूल्यांच्या संघर्षातून यशस्वीपणे मार्ग कसा काढायचा, कोणती उपाययोजना करायची याचे वर्तमान युगातही विशेषत: भारताच्या अंतर्गत आणि बाह्य परिस्थितीतही उपयुक्त असलेले ज्ञान आजही आपल्याला महाभारत ग्रंथातून सहजपणे मिळू शकते.

महाभारतकार चिंतामणराव वैद्य म्हणतात, महाभारतात जागोजागी जे व्यवहारज्ञान सांगितले आहे ते इतरत्र कोठेही सापडणार नाही. जगतात सर्वच मनुष्ये चांगली असू शकत नाही. कुटिलांची कारस्थाने ओळखून कशी हाणून पाडावी आणि आपली नीतिमत्ता राखूनही कुटिलांशी, शत्रूंशी कसे वागावे या विषयीचा ग्रंथ सर्वोत्तमातील उपदेश व मार्गदर्शन अतिशय मार्मिक आहे. अतिशय उच्चतम, आदर्श नीतितत्त्वांचा कलियुगातील व्यावहारिक चौकटीत देश, धर्म, युद्धप्रसंगात कसा कुशलतेने उपयोग करावा, याचे अचूक दर्शन घडविणारा हा ग्रंथ आहे. खोटं बोलू नये 'सत्य ब्रूयात', 'न हि सत्यात्परो धर्म:' सत्यासारखा धर्म नाही, सत्यभाषणाचे पुण्य अश्वमेधाहून जास्त आहे हे आदर्श तत्त्वज्ञान असले तरी कपटी आणि लबाड शत्रूशी धर्माच्या अंतिम यशासाठी 'नरो वा कुंजरोवा' असे मोघम, संदिग्ध, खोटे बोलण्याची लवचीकता कशी ठेवावी, हे मोलाचे मार्गदर्शन हा ग्रंथ अनेक जागी करतो. (उपोद्घात - म. भा. खंड १ ला)

इतिहासाच्या वाटचालीत महाभारताचा हा आदर्श, व्यवहाराचे हे संकेत आम्ही पाळले नाहीत, त्याचा दुष्परिणाम म्हणजे जगाच्या धकाधकीच्या मामल्यात आम्ही बावळट, मूर्ख ठरलो. शत्रु-मित्र विवेक पाळणे आम्हाला जमले नाही. सहस्रावधी वर्षांच्या खडतर वाटचालीतूनही आम्ही काही शिकलो नाही. 'शत्रूला पाठ दाखविणार नाही', 'दिलेला शब्द मोडणार नाही', 'शरण आलेल्या शत्रूला मरण देणार नाही' या सर्व भंपक सद्गुण विकृतींमुळे जिंकण्याची क्षमता असतानाही आम्ही पराभूत होऊन रानोमाळ भटकलो. धर्म, राष्ट्र, समाज यांना दुर्दिन आणले. 'विषवल्ली ही मुळापासूनच उखडून फेकावी लागते, नाही तर तिला पालवी फुटून ती अधिक जोराने फोफावते' हा निसर्गाचा चाणक्याने सांगितलेला राजनीतीतील शाश्वत सिद्धांत आम्ही दुर्लक्षित केला. त्यामुळे वैयक्तिक औदार्याच्या भरीस पडून पृथ्वीराजानी १७ वेळा 'महंमद घोरी' या विषारी वृक्षाकडे दुर्लक्ष केले; त्याचा भयानक परिणाम म्हणजे पुढील हजारो वर्षांमध्ये संपूर्ण भारत 'हिरवा' झाला. चितौडच्या सहस्रावधी हिंदू भगिनींचे जोहार संपन्न करण्याच्या तथाकथित उदात्ततेला आम्हीच कारणीभूत आहोत. त्याच जीवघेण्या उदात्ततेचे आजचे बदललेले स्वरूप म्हणजे 'तुष्टीकरण' सेक्युलॅरिझम! ज्याचा 'दृश्य' परिणाम हिंदू अल्पसंख्य होण्यात आणि चक्रवर्ती राजा भरताच्या- 'भारताचा' भूगोल अधिकाधिक संकुचित होण्यात होऊ घातला आहे. या लेखाच्या निमित्ताने आपले राष्ट्र ज्या महान राजर्षीच्या नावाने ओळखले जाते त्याने पुढील पिढ्यांसाठी कोणता भौगोलिक वारसा ठेवला होता त्याचे मूळ भारतातील वर्णन पाहणे इष्ट राहील. वैशंपायन म्हणतात- हे जनमेजया! तुझ्या श्रेष्ठवंशाचा संस्थापक महाक्रमी दुष्यंताचा महापराक्रमी पुत्र 'भरत' हा आहे. या काळातील सर्व असुरी म्लेंच्छांपासून तो वाघ, सिंह या क्रूर प्राण्यांपर्यंत तो सर्वांचे 'दमन' करीत असे म्हणून त्याला 'सर्वदमन' असेही म्हणत. तो चारही समुद्रापर्यंत पसरलेल्या सर्व पृथ्वीचा स्वामी आणि रक्षणकर्ता होता. अशा विश्वविजेत्या, चक्रवर्ती महान राजाच्या नावाने स्थापन झालेल्या भारत देशाचा मी वारसदार. असे पूर्वज आम्हाला लाभले, हे आमचे भाग्य! आणि संपूर्ण पृथ्वी तर जाऊ द्या फक्त आसेतुहिमाचल हा भूभागही अखंडपणे ज्यांना सांभाळता येत नाही असे वारसदार मला लाभले, याची तक्रार चक्रवर्ती भरताने कोणाजवळ करायची?

९८६०२९६१३१


(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

संजय रामगिरवार

# कोळसा उगाळावा तेवढा काळाच!

यंदा पावसाने कहर केला. एकाच दिवशी २०० ते २५० मिलिमीटरपर्यंत पाऊस झाला. त्यामुळे शहरे तुंबली. देशाने महापूर अनुभवला. 'ग्लोबल वार्मिंग'चा हा परिणाम आहे, हे सांगायला आता कुण्या भविष्यवेत्त्याची गरज नाही. अशा गंभीर परिस्थितीतही कोळशाच्या उत्पादनात वाढ झाल्यामुळे आम्ही आपली पाठ थोपटतो आहोत. गतवर्षीपेक्षा यंदा जून २०२४ मध्ये देशातील कोळसा उत्पादनात १४.५८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. हा कोळसा अर्थात जाळला जाईल, उर्जेच्या उत्पादनात वाढ होईल खरे; त्यासोबतच प्रचंड प्रदूषणही ते घेऊन येईल, हे समजून घेतले पाहिजे. चंद्रपूर महानगरात सध्या एसएनडीटी विद्यापीठाच्या माध्यमातून 'वातावरणातील बदल' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे नियोजन सुरू आहे. पर्यावरणाशी संबंधित अशा कुठल्याही संमेलनादरम्यान पर्यावरण संरक्षणाची चर्चा अगदी जोरात असते. मोठमोठी आश्वासने आणि आव्हाने पेलण्याची कटिबद्धता व्यक्त केली जाते. अशीच चर्चा 'कॉप-२८' याही संमेलनात होती. त्याचे कवित्व काही दिवस चालेल आणि नंतर पर्यावरणातच विरून गेले. पर्यावरण, जलवायू परिवर्तन आणि शाश्वत विकास यावर सध्या जोरात चर्चा आहे. कोळशाचा वापर कमीत कमी कसा करता येईल यावरही चर्चा रंगते. चर्चा करणे सोपे असते. पण त्याची अंमलबजावणी करणे कठीण जाते आणि त्यामुळेच आजवरच्या अनेक आंतरराष्ट्रीय संमेलनानंतरही पर्यावरणाची स्थिती अधिक बिकट होत चालली आहे. कोळसा उत्पादनात होणारी वाढ, हे त्याचेच द्योतक आहे. २०२३-२४ च्या कोळसा अॅक्शन प्लॅनमध्ये १०१२ मिलियन टन कोळशाच्या उत्पादनाचे लक्ष्य निर्धारित केले गेले आहे. सध्या हे उत्पादन ८९३ मिलियन टन आहे. म्हणजेच ११९ मिलियन टन कोळशाचे जास्त उत्पादन केले जाणार आहे.



आशियाई देशात तर कोळशाचा वापर तुलनात्मकदृष्ट्या वाढत आहे. चीन हा जगातील सर्वात मोठा कोळसा उत्पादक देश आहे. त्यानंतर भारताचा क्रमांक येतो. १८ व्या शतकात औद्योगिक क्रांती झाली आणि कोळसा आधुनिक विकासाचा महत्त्वाचा घटक झाला. २१ व्या शतकात तर विद्युत निर्मितीसाठी कोळसा प्रमुख संसाधनाच्या रूपात समोर आला आणि पुढे त्यात कमालीची वाढ झाली. विकासासोबतच कोळसा पर्यावरणाच्या ऱ्हासाचे मोठे कारणही बनला. कोळसा जाळल्याने कार्बन डाय ऑक्साईडसोबतच अनेक ग्रीन हाऊस वायूंची निर्मिती मोठ्या प्रमाणात झाली. वातावरणात एसओ२ आणि एनओएक्स पार्टिकल मॅटर आणि पाऱ्यासारख्या भारी धातूंची मिसळण झाली; जे मानवी जीवनासाठी घातक ठरत आहे. अमलीय वर्षा आणि एकूण पृथ्वीच्या तापमानात वाढ आणि त्यामुळे समुद्राच्या पातळीतही झालेली वाढ अशा अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. फ्लॉय अॅशसारख्या वस्तूचे काय करावे हा गंभीर प्रश्न आहे. त्यामुळे जलस्रोत दूषित होत आहेत. कोळसा काढल्याने जमीन मोठ्या प्रमाणात प्रभावित होत आहे. असे असताना कोळसा आपण हद्दपार का करू शकत नाही, हा प्रश्न समोर उभा राहतो. ऊर्जा उत्पादनासाठी कोळशापेक्षा सोपे आणि स्वस्त संसाधन सध्या दुसरे नाही. कोळसा जवळपास जगाच्या सर्वच प्रदेशांमध्ये सहज उपलब्ध असून तो काढण्याचा खर्चही अन्य संसाधनांपेक्षा खूप कमी आहे. मोठा रोजगारही त्यामागे आहे. उलट, सीईएच्या अहवालानुसार, नवीन ऊर्जा स्रोत आजच्या विजेची गरज भागवूच शकत नाही. २०२३ मध्ये अपारंपरिक ऊर्जा स्रोतांतून केवळ २१२ गेगावॅट वीज निर्मिती होऊ शकली. तर, वित्त वर्ष २०३१-३३ पर्यंत मात्र ९२४ टेरावॅट तास विजेचे उत्पादन होऊ शकते, जे आवश्यकतेनुसार पर्याप्त नक्कीच नाही.

भारतात सध्या कोळशातून ९० टक्के विजेचे उत्पादन होत आहे. जे कमी करून अपारंपरिक उर्जेकडे वळवणे कठीण आहे, हे आकडेच सांगतात. त्यामुळे लगेचच आपण कोळसा उत्पादन थांबवू शकत नाही. मात्र, ते निश्चितपणे कमी करावे लागणार आहे. कारण त्याशिवाय येत्या काळात अन्य कुठलाही पर्याय उरणार नाही. अपारंपरिक ऊर्जा स्रोतांमध्ये हळूहळू पण निरंतर वाढ करीत जावे लागणार आहे. त्यासाठी तंत्रज्ञानाचा विकास वाढणे आवश्यक आहे. नवनवीन ऊर्जा स्रोतांचा शोध लागणे आणि ते भारतासारख्या देशाला परवडेल असा असणे आवश्यक आहे. हे कठीण वाटत असले, तरी तसे करावेच लागले. अन्यथा, येत्या काळात अवघी मानवजात धोक्यात येईल.

९८८१७१७८३२

## प्रासंगिक

मोरेश्वर बडगे

# आणखी किती निर्भया?

पुष्यमित्र उपाध्याय यांनी लिहिलेली एक प्रसिद्ध कविता आहे...

*छोडो मेहंदी खड्ग संभालो, खुद आपण चीर बचालो*
*द्यूत बिछाये बैठे शकुनी, मस्तक सब बिक जायेंगे*
*सुनो द्रौपदी शस्त्र उठालो अब गोविंद न आयेंगे ॥*

कित्येक वर्षांपूर्वी देशाच्या परिस्थितीवर लिहिलेली ही कविता आजही तेवढीच प्रासंगिक आहे. 'द्रौपदी' आजही डेंजर झोनमध्ये आहे आणि 'गोविंद' गायब आहे. १२ वर्षांपूर्वी राजधानी दिल्लीतील एका घटनेने सारा देश हादरून गेला होता. एका तरुण मुलीवर पाच जणांनी केलेल्या अत्याचार आणि मारहाणीमुळे तिला जीव गमवावा लागला होता. बलात्कार झालेल्या युवतीचे नाव उघड करता येत नाही. तसा कोर्टाचा आदेश आहे. त्यामुळे २३ वर्षे वयाच्या या फिजिओ थेरपिस्ट तरुणीला 'निर्भया' या नावाने संबोधले गेले. निर्भया रात्री एका खाजगी बसमधून आपल्या मित्रांसोबत घरी जात असताना सहा जणांनी तिच्यावर अत्याचार केले. इतकेच नव्हे, तर तिला आणि तिच्या मित्राला अर्धमेल्या अवस्थेत रस्त्यात फेकून दिले. तिला वाचवण्यासाठी सरकारने तिला सिंगापूरला नेले. १३ दिवसांनी ती गेली तेव्हा लोक खवळले. जनतेने रस्त्यावर उतरून संताप नोंदवला. राज्यकर्त्यांना या असंतोषाची दखल घ्यावी लागली. २०१३ मध्ये केंद्र सरकारने नवा कायदा आणला. बलात्काराचा गुन्हा अनेकदा करणाऱ्याला फाशीची शिक्षा देणारा कायदा आणला. निर्भयाचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालला. तरीही दोषींना फासावर चढवायला तब्बल सात वर्षे लागली. त्या वेळेस अनेकांना असे वाटले की, किमान शिक्षेच्या भीतीने आता पुन्हा कोणी मुलगी 'निर्भया' होणार नाही. पण आपले हे वाटणे किती व्यर्थ होते; ते नंतरच्या घटनांनी दाखवून दिले. अत्याचार वाढले आहेत आणि कायदा हतबल आहे. तेलंगणा पोलिसांनी आरोपींचा एन्काऊंटर केला तेव्हा जनतेने त्या घटनेचे स्वागतच केले. लोकांना झटपट न्याय हवा आहे. तो देण्यात आपली व्यवस्था कमी पडते आहे. त्यामुळे वेगळेच प्रश्न उपस्थित झाले आहेत. इथे निर्भयाची चर्चा होण्याचे कारण बदलापूर. ठाणे जिल्ह्यातले हे शहर. चार वर्षे वयाच्या दोन चिमुकल्या मुलींवर लैंगिक अत्याचार झाला. त्या ज्या शाळेत जात होत्या तिथल्या सफाई कामगाराने शाळेच्या टॉयलेटमध्ये हे घृणास्पद कृत्य केले. चार दिवसांनी त्या मुलींना त्रास व्हायला लागला तेव्हा पालकांनी दवाखान्यात नेले. तेथे जे कळले त्याने पालक हादरले. पोलिसांनी आरोपीला अटकही केली. ही बातमी आगीसारखी पसरली आणि सारे बदलापूरकर संतापाने रस्त्यावर आले. लोकांनी तब्बल १० तास रेल रोको केले. त्याला फाशी द्या,



एवढीच त्यांची मागणी होती. सरकार टेन्शनमध्ये आले. फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवण्याचे सरकारने जाहीर केले. पण जमाव ऐकत नव्हता. शेवटी लाठीहल्ला करून लोकांना पांगवावे लागले. गाव रस्त्यावर आले नसते तर सरकारने एवढ्या झटपट हालचाल केली असती का? 'दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए...' असे म्हणतात तेच खरे.

विद्यमान परिस्थितीत काहीही सुरक्षित राहिलेले नाही. शाळासुद्धा असुरक्षित झाल्या आहेत. नराधमाच्या पंज्यातून लहान मुलीही सुटत नाहीत, हे चित्र महाराष्ट्राला लाजेने मान खाली घालावे लावणारे आहे. अत्याचार पूर्वीही होत, पण पीडितेला जिवाने मारले जात नव्हते. आता तिला जिवाने संपवले जाते. तुम्हाला धक्का बसेल, पण ऐका... आपल्या देशात दररोज ७७ बलात्कार होतात. चार वर्षांपूर्वीचा हा सरकारी आकडा आहे. चार वर्षांपूर्वी २८ हजार बलात्कार झाले. यात अडीच हजार मुली अल्पवयीन आहेत. आता तर हा आकडा फुगला असणार! कारण बलात्कार, अत्याचार या घटना रोजच्या झाल्या आहेत. 'रोज मरे त्याला कोण रडे.' बदलापूरसारखी एखादीच घटना घडते आणि सारा गाव रस्त्यावर येतो. पण हे असे किती चालू द्यायचे? प्रत्येक अत्याचारानंतर त्या निर्भयाला न्याय मिळवून देण्यासाठी समाजाने रस्त्यावर यावे, आंदोलन करावे असे सरकारला आणि पोलिसांना वाटते का? सरकारचे ठीक आहे. पण समाज म्हणून आपण केव्हा जागे होणार आहोत? लाख-लाखांच्या शहरांमध्ये अशी एखादी घटना होणारच. त्याला पोलिस काय करणार, या भंपक गोष्टी झाल्या. कोणताही पोलिस आयुक्त आपल्या हद्दीत अत्याचार वाढले अशी आकडेवारी देईल? आकडे वाकवले जातात. पण त्याने वास्तव थोडीच लपते. बदलापूरच्या पालकांची तक्रार नोंदवून घ्यायला पोलिसांनी संबंधित पालकांना तब्बल १२ तास ताटकळत ठेवले, असे सांगितले जाते. हे खरे असेल तर न्यायाची कोणाकडून अपेक्षा करावी? परवापर्यंत महाराष्ट्रातील शहरे महिलांच्या बाबतीत सुरक्षित आहेत, असा दावा आपण सारेच करीत होतो. पण आज ही हिंमत होईल? रात्र सोडा, दिवसही वैऱ्याचे होऊ लागले आहेत. टीव्ही चॅनेलसारखी समाज माध्यमे या कामी मोठी भूमिका निभावू शकतात. पण आपली चॅनेल तर अशा घटनांचा बाजार मांडतात; त्याचे दु:ख आहे.

शेवटी हे असे का घडते? आई मोठ्या विश्वासाने मुलाचे नाव 'राम' ठेवते. मग तो 'रावण' का निघतो? बाईकडे उपभोगाचे साधन म्हणून बघायची दृष्टी समाजच देत असतो. घरातून बाहेर पडा. मुलींकडे काय नजरेने पाहिले जाते? काय टोमणे मारले जातात? ते आपण रोज पाहत असतो. त्यातूनच बाईकडे पाहण्याची दृष्टी बदलते. ओरबडा, ओरबाडता आले नाही तर तिला संपवा, मला नाही तर कोणालाच नाही, ही मानसिकता सध्याच्या बलात्कार, अॅसिड अटॅक आणि तसल्या घटनांना कारणीभूत ठरते आहे. मला चांगले आठवते; चार वर्षांपूर्वी विदर्भातील वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाटच्या एका तरुणीवर एका विकृत मानसिकतेच्या तरुणाने तिला पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रकार केला. हिंगणघाटचा प्रकार प्रेमाला प्रतिसाद न देण्यातून झाल्याचे पोलिसांचे म्हणणे होते. मनासारखे घडत नाही म्हणून या प्राध्यापिकेस जिवंत जाळण्याची मानसिकता भयानक आहे. वाढत्या अत्याचाराच्या घटनांना आजचे सामाजिक वातावरण जबाबदार आहे. मुलांवर लहानपणापासून चांगले संस्कार झाले तर तो वाईट गोष्टींच्या नादी लागणार नाही. स्त्रीकडे, मग ती मोलकरीण असो की आणखी कोणी, तिच्याकडे आदराने पाहिले पाहिजे. घरातली माणसेच हे सांगू शकतात. अलिकडचे आई-वडील मुलामुलींना हे सांगत असतील असे म्हणणे धाडसाचे ठरेल. हल्ली जमाना बदलला आहे. मुलीकडे मान वर करून न पाहणाऱ्या मुलाला 'बुद्धू' मानले जाते. सिनेमा आणि टीव्हीतल्या शोमधूनही जे दाखवले जाते ते भयंकर असते. सेन्सार बोर्डच गायब आहे! तिथे कोण कोणाला आवरणार, असे आजचे चित्र आहे. अशा हवेत पालकांची मोठी जबाबदारी आहे. आपला मुलगा वयात येत असताना पालकांनाच अधिक मोकळे व्हावे लागेल. त्याच्याशी मोकळा संवाद साधावा लागेल. विशी-पंचविशीतले वय म्हणजे वादळ असते. या वयातल्या मुलं-मुली स्वातंत्र्याच्या शोधात असतात. ते मिळते तिकडे त्या वाहवत जातात. निर्भयाचा प्रश्न वेगळा आहे. नव्या हवेत त्यासोबत इतरही प्रश्न चिकटले जात आहेत. कायदा आपले काम करील. पण त्या आधी समाजाने आणि त्यातल्या त्यात आई-वडिलांनी आपली जबाबदारी ओळखली तर बरेचसे प्रश्न हलके होतील.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)


### कालाय तस्मै नमः

सर्वात शक्तिमान समजला जातो तो म्हणजे काळ. काळ हा कोणासाठी थांबत नसतो, तो येतो आणि जातो. येताना तो काही उद्देश, काही जाणीव देऊन जातो. जागे व्हा म्हणतो. काळ हा प्रेरणा देणारा, शून्यातून विश्व उभे करणारा पण ठरतो. पराक्रमाला जागे करतो. करेल ती पूर्व दिशा अशी शिकवण देतो. धाडस, विजिगीषू वृत्ती जागृत करतो. आपल्या देशावर अनेक संकटांवर आपण काळानुरूप मात केली, अनेक आक्रमणे झाली आणि पुन्हा महाराष्ट्र निर्मितीच्या मार्गावर लागलो. काळच सांगून जातो की उठा, पराक्रम करा, शत्रूचा नायनाट करा आणि पुढे जा. याच काळाने शालिवान राजाला शक निर्माण करण्याची प्रेरणा दिली आणि शालिवाहन शक सुरू झाले. परिस्थितीची भयानकता पाहून राजे शिवाजी मुघलांशी लढले. हिंदुराष्ट्र स्थापन केले. असा हा काळ पराक्रमाची, शौर्य गाजविण्याची प्रेरणा देतो व प्रसंगी बलिदानाचे महत्त्व पटवतो म्हणून 'कालाय तस्मै नम:' म्हणू या!

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

### लालपरी नफ्याच्या उंबरठ्यावर

सातत्याने आर्थिक संकटाशी सामना करीत गावा, घरांपर्यंत पोहोचविणारी एसटी महामंडळाची लाल परी आपल्या ३१ विभागांपैकी सुमारे अठरा विभागांतून नफ्याच्या उंबरठ्यावर पोहोचली, ही बातमी सुखद समाधान देणारी आहे. एसटी जगली पाहिजे, कायम धावती राहावयास हवी, कारण सध्या सर्वसामान्यांना



आर्थिकदृष्ट्या तीच परवडणारी सोय होय. ज्या ज्या प्रयत्नांतून, तडफेने लाल परी नफ्याकडे प्रवास करतेय् त्याच उमेदीने एसटी आगारातील स्वच्छतेकडे, प्रसन्नतेकडे, उपाहारगृहांच्या व्यवस्थितपणाकडे आणि मुख्यत: गाड्यांच्या वेळापत्रकांकडे असेच जातीने लक्ष दिले गेले, अग्रक्रमाने पाहिले गेले तर एसटी मंडळाचे सारे विभाग, आगार नफ्याचा उंबरठा जलद गतीने पार करतील, यात शंका नाही. मात्र, प्रशासनाची इच्छाशक्ती जबरदस्त हवी आणि प्रवाशांची साथ सोबत, सहकार्य सुद्धा...

**विश्वनाथ पंडित**/९५८८४५०४४२

## वाचक पत्रे

●● ●●

### लष्करी शिक्षण हवे!

राष्ट्रीयत्वाचे संस्कार रुजविण्यासाठी शालेय जीवनातच लष्करी प्रशिक्षण प्रत्येक विद्यार्थी-विद्यार्थिनींना अनिवार्य करण्याची आवश्यकता असल्याचे सुमेधाताई चिथडे यांनी दिलेला विचार मौलिक असून आज खरोखरच त्याची अत्यंत आवश्यकता भासते आहे. जेणेकरून त्यागातील आनंद, राष्ट्रप्रेम, योगदान, बंधुभाव, निरपेक्षता, कष्टाची किंमत आणि श्रमाची शक्ती, प्रतिकूल परिस्थिती ही धाडसाने सामना करण्याची वृत्ती, शिस्त या संस्कारांची होत असलेली घसरण निदान लष्करी शिक्षणाच्या माध्यमातून तरी जोपासली जाईल. याची सुरुवात शालेय शिक्षणाच्या पायरीवरून होणे महत्त्वपूर्ण आहे. एक उत्तम, सुसंस्कृत शिस्तबद्ध नागरिक यातून तयार होईल. संबंधितांनी यावर सकारात्मक निर्णय घ्यावा, असे वाटते.

**विश्वनाथ पंडित**/९५८८४५०४४२

●● ●●

### मोफतचे राजकारण कुठवर?

'लाडकी बहीण योजनेची रक्कम तीन हजार करणार' ही 'तरुण भारत'मधील बातमी वाचली. ही घोषणा दस्तुरखुद्द मुख्यमंत्र्यांनी केली. याला येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने विशेष महत्त्व प्राप्त होते. आर्थिकदृष्ट्या दुर्बलांना मदत करणे हे शासनाचे कर्तव्यच आहे, याबद्दल दुमत नाही. त्यादृष्टीने प्रामाणिक करदात्यांचे बहुमूल्य योगदान असलेला सरकारी तिजोरीतील पैसा हा आरोग्य, शिक्षण, रेशन, रोजगार इत्यादी बाबींवर खर्च होण्यास काहीही हरकत नाही. परंतु अलिकडील काळात या देशात सगळेच राजकीय पक्ष हे मतदारांना आकृष्ट करण्यासाठी निवडणुकांमध्ये आपली पोळी भाजण्यासाठी रोखीने पैसे देण्याच्या योजना आणतात. आता अशा योजनांमध्येही खोटी कागदपत्रे देऊन लाभ लाटणारेही असणार, हे ओघाने आलेच. स्त्रीने मोलमजुरी करून मिळविलेले पैसे नवरा हिसकावून घेऊन दारूवर खर्च करतो, हे एक विदारक वास्तव आहे म्हणून रोखीपेक्षा वैद्यकीय मदत आणि शिक्षण यावर भर द्यावा. मुळात पैसे रोखीने देणे हे अतिशय चुकीचे धोरण आहे. यामुळे सुस्त, कामचुकारपणाही वाढू शकतो. या बाबतीत समाज माध्यमातून किंवा वृत्तपत्रांमधून बऱ्याच मंडळींनी विरोध आणि मतप्रदर्शन केले आहे. तरीही भविष्यात काहीही सुधारणा होण्याची सूतराम शक्यता नाही. कारण प्रामाणिक करदात्यांनी कितीही निषेध नोंदविला तरीही त्यांच्या निवडणुकीतील अल्प मत संख्येपेक्षा मोफत योजनेतील बहुसंख्य मतदार निश्चितच जास्त असणार. शेवटी 'आईजीच्या जीवावर बाईजी उदार' हेच खरे. यावर कोणत्याही सरकारने करदात्यांचा पैसा कसा वापरायचा आणि राजकीय पक्षांच्या निवडणूक जाहीरनाम्यातील आश्वासनांवर अंकुश ठेवण्यास कठोर मार्गदर्शक संहितेची नितांत गरज आहे. परंतु हे करणार कोण, हाच खरा यक्षप्रश्न आहे.

**राम राजे**/९४२१७७९९४५

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# जनतेचे प्रेम हाच राजकीय पुढाऱ्यांचा दागिना असतो- आ.गुट्टे

**गंगाखेड,/प्रतिनिधी:** कोणाला विजयी करायचे आणि कोणाला पराभूत करायचे, हे माय-बाप जनतेच्या हातात असते. त्यामुळे लोकशाहीत जनता सार्वभौम असते. एखाद्या माणसाला उंचीवर नेण्याची किमया जनताच करते आणि जमिनीवर आणण्याचे काम सुध्दा जनताच करते. म्हणून राजकीय क्षेत्रात जनतेचे प्रेम हाच राजकीय पुढाऱ्यांचा दागिना असतो, असे प्रतिपादन गंगाखेडचे रासप आमदार डॉ. रताकर गुट्टे यांनी केले.

आळंदी देवाची येथील रसिकलाल धारीवाल सभागृहात आयोजित कौटुंबिक स्नेह मेळाव्यास संबोधित करताना ते बोलत होते. या मेळाव्यास गंगाखेड विधानसभेतील पुणे व आळंदी येथे वास्तव्यास असलेल्या हजारो लोकांनी उत्स्फूर्तपणे गर्दी केली होती. तसेच महिलांची संख्या लक्षणीय होती. पुढे बोलताना आ.डॉ.गुट्टे म्हणाले की, गेल्या पाच वर्षांत गंगाखेड विधानसभा मतदारसंघाचा कायापालट करण्यासाठी हजारो कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. तसेच ४० वर्षापासून प्रलंबित असलेल्या अनेक प्रश्न सोडवले आहेत. रस्ते, पाणी आरोग्य, शिक्षण, वीज यासह अनेक पायाभूत सुविधांचे प्रश्न मार्गी लावले आहेत. नागरिकांचे वैयक्तिक अडचणीही दूर केल्या आहेत. तरीही तुमचे काही प्रश्न व समस्या असतील, तर त्याही मार्गी लावण्याचा प्रमाणिक प्रयत करीन. तीन तालुक्याच्या आपल्या मतदारसंघात जवळपास २८४ गावे आहेत. त्या प्रत्योक गावात वेगवेगळ्या योजनेतून विकास निधी पोहोचला आहे, याचा आनंद वाटतो. तसेच तब्बल ४७५ किलोमीटर रस्त्यांचे काम पूर्ण होणारा गंगाखेड हा महाराष्ट्रातला एकमेव विधानसभा मतदारसंघ आहे, हे सांगताना मला विशेष अभिमान वाटतो. आपल्या मतदारसंघातील १७५ गावात स्मशानभूमी बांधकाम पूर्ण केले. प्रत्योक तांड्यावर सेवालाल महाराज सभामंडप, मातंग वस्तीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह, बौद्ध वस्तीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह आणि धनगर वस्तीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी सांस्कृतिक सभागृह देवून आपल्या उपकारातून थोडाफार उत्तराई होण्याचा प्रामाणिक प्रयत केला असल्याचेही आ.डॉ.गुट्टे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, तत्पूर्वी, उपस्थित महिलांच्या वतीने प्रातिनिधिक माता-भगिंनींना आ.डॉ. गुट्टे व आ.दिलीप मोहिते यांचे औक्षण करून राखी बांधली. परिणामी, कार्यक्रमाचे औचित्या साधून आ.डॉ.गुट्टे यांच्या शुभहस्ते उपस्थित महिलांना भावाची ओवाळणी म्हणून सुबक व आकर्षक साडी चोळी आणि पाच किलो साखरेचे वाटप करण्यात आले. अतिशय उत्साहात संपन्न झालेल्या या कौटुंबिक सोहळ्यात अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त करून मतदारसंघातील विकास कामांचा आढावा उपस्थित जनतेसमोर मांडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी हनुमंत मुंढे, तर सूत्रसंचालन पदुदेव जोशी यांनी केले. आभार रामप्रसाद सातपुते यांनी मानले. यावेळी खेडचे आमदार दिलीप मोहिते, युवा उद्योजक धनराज गवळी, मंदिर ट्रस्टी अजित वडगावकर, माजी नगराध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे, माजी नगरसेविका वर्षाताई शिंदे यांच्यासह मित्रमंडळाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, मतदारसंघातील सर्व स्थानिक रहिवाशी हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

तरीही मी समाधानी नाही! गंगाखेड विधानसभा मतदारसंघात कोट्यवधी रुपयांची कामे झाली असली, तरी मी समाधानी नाही. कारण, मला माझे तीन तालुके महाराष्ट्रात नावारूपाला आणायचे आहेत. त्यासाठी मी अहोरात्र परिश्रम घेत



आहे, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी सांगितले. म्हणून तुम्ही केवळ आमदार नव्हे, तर मंत्री सुध्दा व्हाल! २०१९ सालच्या निवडणुकीत तुमच्यावर आरोपांची सरबत्ती झाली. तरीही तुमचे कार्यकर्ते निधड्या छातीने लढले. गावोगावी पोहोचले आणि केवळ दहा दिवसात तुम्हाला आमदार केले. त्यामुळे असे जीवाभावाचे जिगरबाज कार्यकर्ते लाभायला सुध्दा भाग्य लागते. म्हणून तुम्ही नशीबवान आहात. त्यामुळे येत्या निवडणुकीत तुमच्या प्रामाणिक व एकनिष्ठ कार्यकर्त्यांच्या बळावर तुम्ही केवळ आमदार नव्हे, तर मंत्री सुध्दा व्हाल, असा विश्वास आमदार दिलीप मोहिते यांनी व्यक्त केला.

## संक्षिप्त वृत्त...

### त्या पथनाटयाव्दारे परभणीकरांचे लक्ष

**परभणी,/प्रतिनिधी:** कलकत्ता येथील वैद्यकीय महाविद्यालयातील महिला डॉक्टरवरील बलात्कारासह क्रुरहत्येचा व बदलापूरातील विद्यार्थीनीवरील अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ दयावन सरकार संघटनेने गुरुवारी (दि.२२) जिल्हाधिकारी कार्यालयावर मोठा मोर्चा काढून निषेध नोंदवला तसेच ठिकठिकाणी पथनाट्यांद्वारे जनजागृतीसुध्दा केली.

संपूर्ण देशात वाढत्या अत्याचाराच्या घटनांना कुठेतरी आळा बसला पाहिजे, या प्रमुख उद्देशाने खानापूर फाटा, विद्यापीठ प्रवेशद्वारे, श्री शिवाजी महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर व जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह सदस्यांनी कलकत्ता व बदलापूर येथील घटनांच्या पार्श्वभूमीवर सुंदर असे पथनाट्य सादर केले. त्याद्वारे नागरीकांचे लक्ष वेधून घेतले. यामध्ये सिध्दार्थ खाडे, विकास ससाणे, सुरज शेळके, वैभव झोडपे, बाळू हातागळे, अभिजित भालेराव, विकास राक्षे, राहूल ठोके, गौतम अंबुरे, देविदास टेकूळे, बबलू धबाले, प्रशांत साळवे, बाळासाहेब खंदारे, गोलू नारायणकर भूजंग खंदारे आदी सहभागी झाले होते.

या संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष संजय गायकवाड, युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष अमित भालेराव, रमेश घनघाव, कृष्णा शिंदे, आकाश अहिरे, प्रदीप मुळे, सिध्दार्थ खाडे आदींनी प्रशासनास निवेदन सादर करीत या दोन्ही घटनातील आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणी केली.

### लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत

#### जायकवाडीत ३३ टक्के पाणी : सिंचनाचा प्रश्न मार्गी लागणार

**परभणी,/प्रतिनिधी :** जायकवाडी जलाशयात गुरुवारी सकाळपर्यंत ३३.१० टक्के एवढा पाणीसाठा उपलब्ध झाला असून त्यामुळे जायकवाडीच्या लाभक्षेत्रांतर्गत पिण्याच्या पाण्यासह सिंचनाचा प्रश्न सुटणार आहे.

यावर्षी जायकवाडीच्या पाणलोट क्षेत्रात पुरेसा पाऊस झाला नाही. त्याचा परिणाम जूलै अखेरपर्यंत जायकवाडीत पाण्याची आवक झाली नाही. परंतु, या महिन्यात नाशिक जिल्ह्यात पडलेल्या पावसामुळे व जायकवाडीच्या वरच्या भागातील छोटी मोठी धरणे ओवरफ्लो झाल्याने जायकवाडीत पाण्याची आवक सुरु झाली. गुरुवारी सकाळपर्यंत मागील ४८ तासात या जलाशयात ४२८८ क्युसेक एवढ्या वेगाने पाण्याची आवक सुरु होती. या जलाशयात ३३.१० टक्के एवढा पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. त्यामुळे लाभक्षेत्रांतर्गत खरीप व रब्बी पिकांकरीता पाणी उपलब्ध होणार हे निश्चित झाले आहे.

जायकवाडीच्या लाभक्षेत्रात जवळपास १ लाख ८३ हजार ३२२ हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली आहे. विशेषतः २०८ किलो मीटर अंतराच्या डाव्या कालव्यावर १ लाख ४१ हजार ६४० हेक्टर शेत जमीनीचे सिंचन अवलंबून आहे. छत्रपती संभाजी नगर, जालना व परभणी जिल्ह्यातील टेलपर्यंतच्या गावांना जायकवाडीतील पाणी उपलब्ध होत आले आहे. या खरीप व रब्बी हंगामात पाणी पाळी मिळणार आहे.

### बी.आर.कुंडगीर राष्ट्रवादीत दाखल



**परभणी,/प्रतिनिधी :** सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी व गंगाखेड तालुक्याचे भूमीपुत्र बी.आर. कुंडगीर यांनी बुधवारी (दि.२१) मुंबईत ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार व प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

यावेळी जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार ॲड. विजय गव्हाणे, प्रदेश उपाध्यक्ष भिमराव हत्तीअंबीरे, रमाकांत कुलकर्णी यांच्यासह अन्य उपस्थित होते. कुंडगीर यांच्या पती सौ. करुणाताई कुंडगीर यांनी गेल्या विधानसभा निवडणूकीत गंगाखेड मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीमार्फत निवडणूक लढविली होती. सौ. कुंडगीर या जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या आहेत.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३



## तेलभरेची राज्यस्तरीय विज्ञान मेळाव्यासाठी निवड
## अ.भा.स्तरावर विद्यार्थी विज्ञान मेळावात प्रथम

**सेलू/ प्रतिनिधी-** श्रीराम प्रतिष्ठान संचलित एल के आर रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूल ची विद्यार्थिनी कु. तनिष्का अनंत तेलभरे वर्ग ९ वी हिने अखिल भारतीय मराठवाडा विभागस्तरीय विज्ञान मेळाव्यात प्रथम क्रमांक मिळवला.गूरूवार २२ रोजी छत्रपती संभाजी नगर येथे या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

अखिल भारतीय विभागस्तरीय विज्ञान मेळाव्यासाठी छत्रपती संभाजी नगर, बीड, जालना, हिंगोली, परभणी जिल्ह्यातील निवड झालेले विद्यार्थी सहभागी झाले होते. या अखिल भारतीय विज्ञान मेळाव्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर सुरुवातीला विद्यार्थ्यांची बहुपर्यायी प्रश्नांची परीक्षा घेण्यात आली, तसेच विद्यार्थ्यांचे भाषण कौशल्य, पावर पॉइंट प्रेझेंटेशन व परीक्षकांनी विद्यार्थ्यांना विचारलेल्या प्रश्नाच्या आधारे विभागीय विज्ञान मेळाव्यासाठी मराठवाडा विभागातुन दोन विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. तरी कु. तनिष्का अनंत तेलभरे या विद्यार्थिनीने सर्व कसोट्यावर उत्तम गूण मिळवून अप्रतिम प्रदर्शन केले.यामूळे राज्यस्तरीय विज्ञान मेळाव्या साठी निवड झाली आहे.यासाठी विज्ञान शिक्षक नारायण चौरे यांनी मार्गदर्शन केले व कु. गायत्री पावडे वर्ग ९ वी हिचे सहकार्य केले.

या यशासाठी श्रीराम प्रतिष्ठान संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ संजय रोडगे, सचिव डॉ सविता रोडगे, प्रशासकीय अधिकारी प्रा महादेव साबळे, प्रिन्सिपल कार्तिक रताला,प्रगती क्षीरसागर, शाळेतील शिक्षक यांनी अभिनंदन केले व पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

## शाळांना आता यापुढे सीसीटीव्ही कॅमेरे अनिवार्यच राहणार

### शिक्षण विभागाचे आदेश- विद्यार्थ्यांसाठी निर्णय

**परभणी,/प्रतिनिधी-** राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या सुरक्षाविषयक उपाययोजनांची काटेकोरपणे अंमलबजावनी करावी, असे आदेश राज्याच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने एका लेखी पत्रकाद्वारे बजावले असून शाळांसह परिसरात संस्थांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, असे सक्तपणे बजावले सुध्दा आहे.

शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच सुरक्षिततेचा मुद्दा महत्वपूर्ण ठरत आहे. कारण, अलिकडील काळात काही अनुचित घटना घडल्या आहेत. त्यामुळेच शालेय विद्यार्थ्यांच्या विशेषतः मुलींच्या सुरक्षिततेसाठी शालेय शिक्षण विभागाने शाळांना उपायोजनांबाबत काटेकोरपणे अंमलबजावनी व्हावी, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्या शाळा व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बंधनकारक केले आहेत.

ठराविक अंतराने त्याचे फुटेज तपासणेसुध्दा अनिवार्य केले आहे. काही आक्षेपार्ह बाबी आढळल्यास स्थानिक पोलिसांना त्या संबंधीच्या सूचना द्याव्यात, असे स्पष्ट निर्देशही विभागाने दिले आहेत. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करतेवेळी काळजीपूर्वक नियुक्त्या व्हाव्यात, चरित्र पडताळणीचा अहवाल पोलिस प्रशासनाकडून घ्यावा, ६ वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी प्राधान्याने महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, तक्रारपेट्या बसवाव्यात, सखी सावित्री समित्यांचा नेहमी आढावा घ्यावा. शिक्षण विभागानेसुध्दा समित्यांमार्फत बैठकांमधून आढावा घ्यावा यासह अन्य बाबी या विभागाच्या अव्वर सचिवांनी काढलेल्या परिपत्रकाद्वारे स्पष्ट करण्यात आल्या आहेत.





**गंगाखेड- बदलापूर येथील दोन विद्यार्थीनींवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ महाविकास आघाडी व मित्रपक्षांच्या वतीने महाराष्ट्र बंद ची हाक देण्यात आली आहे.**

## बदलापूर घटनेच्या निषेधार्थ आज गंगाखेड बंद देखील सहभागी होणार

**गंगाखेड/ प्रतिनिधी-** बदलापूर येथील दोन विद्यार्थीनींवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ महाविकास आघाडी व मित्रपक्षांच्या वतीने महाराष्ट्र बंद ची हाक देण्यात आली आहे. या बंद मध्ये गंगाखेड मधील व्यापारी बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन गंगाखेड महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.
या संदर्भात आज गंगाखेड पोलीस ठाण्याचे निरीक्षक दिपककुमार वाघमारे यांना निवेदन देण्यात आले. काँग्रेस तालुकाध्यक्ष गोविंद यादव, राष्ट्रवादी काँग्रेसचे ( शरदचंद्र पवार ) तालुकाध्यक्ष ऊद्धवराव सातपुते, शिवसेना ( ऊद्धव ठाकरे ) जिल्हा उपप्रमुख ॲड. मनोज काकाणी, शहर प्रमुख जीतेश गोरे, राष्ट्रवादी तालुका उपाध्यक्ष नारायण घनवटे, माजी नगरसेवक मुस्तफा मामा आदि उपस्थित होते. आज सकाळी १० वाजता शहरातील भगवती चौक येथून मुक मोर्चा काढून तहसीलदारांना निवेदन दिले जाणार आहे.

# ४२ वर्षांनी जागवल्या शालेय आठवणी- सांगोरे यांची भेट

**सेलू ,/प्रतिनिधी:** ४२ वर्षांनी जागवल्या शालेय आठवणी सुरतचे उद्योजक गणेशभाई सांगोरे यांची सेलूच्या नूतन विद्यालयाला भेट दिली.

सुरत (गुजरात) येथील ईप्रॉम्पट एंटरप्राईजचे उद्योजक आणि सेलू येथील नूतन विद्यालयाचे माजी विद्यार्थी गणेशभाई कन्हैयालालजी सांगोरे यांनी तब्बल ४२ वर्षांनी नूतन विद्यालय परिसरात येऊन शालेय आठवणींना उजाळा दिला. श्री.सांगोरे हे रविवारी, १८ ऑगस्ट रोजी सेलू शहरात आले होते. प्रारंभी शालेय परिसरातील दलित मित्र श्रीरामजी भांगडिया यांच्या पुतळ्याला श्री.सांगोरे यांनी अभिवादन केले. यावेळी सतीश जोशी, बाबासाहेब हेलसकर आदी उपस्थित होते. यानिमित्ताने मनोजकुमार बिनायके यांच्यासह अन्य वर्गमित्रांच्या गाठीभेटी घेत १९८० ते १९८२ या काळातील शालेय आठवणींना त्यांनी उजाळा दिला. श्री सांगोरे यांनी सांगितले की; सुरतमध्ये ईप्रॉम्प्ट एंटरप्राईज या इलेक्ट्रॉनिक उद्योगाद्वारे ७० ते ८० जणांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे. या उद्योगाद्वारे ऑनलाईन-युपीएस सिस्टीम्स, सर्वो स्टॅबिलायझर ॲण्ड इंडस्ट्रीयल बॅटरीजच्या उत्पादनाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली जात आहे. या उत्पादनाला चांगला प्रतिसाद आहे. शाळेचा सुंदर परिसर पाहून आनंद झाला असून शाळेच्या विकासासाठी निश्चित सहकार्य राहील असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी एनएमएमएस परीक्षेतील विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन करीत शुभेच्छा दिल्या. शाळेच्या वतीने जेष्ठ शिक्षक बाबासाहेब हेलसकर यांनी श्री सांगोरे व श्री जोशी यांचे स्वागत केले. गुजरातमध्ये उद्योगक्षेत्रात एक यशस्वी उद्योजक म्हणून श्री सांगोरे यांनी ओळख निर्माण केली. नूतन चा लौकिक वाढवला, याचा शाळेचा अभिमान असल्याचे श्री.हेलसकर म्हणाले. यानिमित्ताने शाळेच्या वर्गखोल्या, संपूर्ण परिसर तसेच सेलू शहराचे बदलते स्वरूप पाहूनही उद्योजक सांगोरे यांनी आनंद व्यक्त केला.

### सेलूतील नुतन विद्यालयास उद्योजकांनी लावली उपस्थिती



धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## राष्ट्रीय महामार्गाच्या नुकसान भरपाईसाठी नितीन गडकरींच्या घरासमोर उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२३ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट गावावरून गेलेल्या मुंबई - हैदराबाद या राष्ट्रीय चौपदरीकरणासाठी भूसंपादन करण्यात आले. या भूसंपादनात नुकसान झालेल्या गावकऱ्यांच्या मालमत्तेच्या नुकसान भरपाईपोटी मंजूर असलेली मिळणारी रक्कम चार कोटी ६०लाख ५२ हजार ७२६ रुपये देण्यास संबंधित खाते टाळाटाळ करत आहे. नुकसान भरपाईची रक्कम मिळण्याच्या मागणीसाठी जळकोटचे गावकरी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या नागपूर येथील निवासस्थानासमोर येत्या सोमवार(दि.२६) पासून आमरण उपोषणाला बसणार आहेत.

याबाबत धाराशिवच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की, जळकोट (ता. तुळजापूर) येथील मालकी असलेल्या जागा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९ (नवीन क्रमांक ६५) निवाडा याचिकेमधील आदेशाप्रमाणे दि.३०/७/२०२१ रोजी मे. उपजिल्हाधिकारी तथा भूसंपादन अधिकारी , मांजरा प्रकल्प ,धाराशिव यांच्या कार्यालयाकडून निवाडा पारित करण्यात आला. त्यानंतर उपजिल्हाधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मांजरा प्रकल्प, धाराशिव आमच्याकडून प्रकल्प संचालक, प.का.ई. सोलापूर यांच्याकडे बऱ्याच वेळा मंजूर झालेल्या निवाड्याप्रमाणे निधी उपलब्ध करून देण्याबाबत पत्र पाठवण्यात आली आहेत.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...



### रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात विद्यापीठ वर्धापन दिन उत्साहात साजरा

**तुळजापूर, दि.२३ ऑगस्ट -**

येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात दि.२३ ऑगस्ट रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयसिंगराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६६ वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे आणि संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयसिंगराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

### धाराशिव जिल्ह्यात सेवाकुंडचा सेवाभावी उपक्रम

**लोहारा, दि.२३ ऑगस्ट -**

डॉ.अनिलकुमार गायकवाड सामाजिक सेवाकुंड या ट्रस्ट मार्फत डॉ.अनिलकुमार गायकवाड यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र राज्यात तब्बल ६१ हजार फळझाडाची रोपे वाटण्याचा कार्यक्रम ट्रस्टच्या माध्यमांतून घेण्यात आला आहे. जिल्ह्यातील या उपक्रमाचा शुभारंभ उमरगा तालुक्यातील अचलबेट देवस्थानचे व्यवस्थापक दयानंद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी योगशिक्षक अमर वाघमारे, रामलिंग पटसाळगे, भाजपा नेते सिद्धेश्वर माने, चैतन्य पवार, प्रदीप बोळेगावे, शैलेश नागणे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत अचलबेट, कुन्हाळी, नाईचाकुर शेकडो रोपाच वाटप नोंदी घेऊन करण्यात आले.

## धाराशिव-तुळजापूर रेल्वे मार्गाचे काम एक सप्टेंबर पासून सुरु होणार : आ.राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ ऑगस्ट -**

सोलापूर-तुळजापूर-धाराशिव रेल्वे मार्गाच्या एकुण ११० किमी लांबी पैकी धाराशिव ते तुळजापूर या ४१.४ किमी लांबीच्या रेल्वे लाईनच्या कामाची रु. ४८७ कोटींची निविदा अंतिम झाली असून कंत्राटदाराला नियुक्ती आदेश देऊन ०१ सप्टेंबरपासून काम करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी यांच्या उपस्थित झालेल्या बैठकीमध्ये आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी संबंधित कंत्राटदार व रेल्वे अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.



आ.राणजगजितसिंह पाटील यांच्या विनंतीवरून जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांनी या कामाचा आढावा घेण्यासाठी रेल्वे विभागाचे अधिकारी व संबंधित कंत्राटदाराची बैठक बोलाविली होती. सोलापूर-धाराशिव रेल्वेमार्गाच्या कामाचा कालावधी ५ वर्षावरून अडीच वर्षे करण्यासाठी या कामाचे तीन भाग करण्यात आले असून पहिल्या भागाची निविदा अंतिम झाली असून दुसऱ्या भागाच्या निविदेची छाननी प्रक्रिया सुरू आहे. सदरील प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून कार्यारंभ आदेश देण्याच्या सुचना देखील या बैठकीमध्ये रेल्वे अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

रेल्वेमार्गाचे काम विहीत कालावधीत पूर्ण करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम निश्चित करून त्याचा बार चार्ट सादर करण्याच्या सूचना कंत्राटदाराला दिल्या आहेत. सुरुवातीचे तीन महिने दर पंधरा दिवसाला या कामाचा आढावा घेण्यात येणार असून तद् नंतर दरमहा कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यात येणार आहे.

वन विभाग व एमआयडीसीच्या जागेबाबतच्या अडचणी सोडविण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिका-यांनी संबंधित अधिकाऱ्याशी चर्चा करून आवश्यक ते निर्देश दिले आहेत. रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांनी व कंत्राटदारांनी रेल्वे मार्गाच्या जागेची पाहणी केली असून जवळपास ९५ टक्के जमीनीच्या हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्णत्वास येत आहे.

या रेल्वे मार्गामुळे धाराशिव येथे जंक्शन होणार असून आई तुळजाभवानीचे तुळजापूर तीर्थक्षेत्र रेल्वेने जोडले जाणार आहे. त्यामुळे या भागातील पर्यटनाला नवी दिशा मिळणार असून रोजगार निर्मिती व अर्थकारणाला मोठी चालना मिळणार आहे.

सदरील बैठकीस प्रभारी अप्पर जिल्हाधिकारी शिरीष यादव, उपविभागीय अधिकारी श्री.संजय ढवळे, तहसिलदार श्रीमती मृनाल जाधव, रेल्वे विभागाचे उपमुख्य अभियंता बनसोडे, सहाय्यक कार्यकारी अभियंता मस्के, अभियंता नुर, यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## लोटस पोदार लर्न स्कूल येथे सायबर शिक्षा फॉर सुरक्षा कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२३ ऑगस्ट -**

शिवछत्रपती बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लोटस पोदार लर्न स्कूल येथे क्लिक हील फाऊंडेशन कंपनी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्हा स्तरावर सचिव म्हणून नियुक्त प्रतिक्षा रमेश पांगे यांची सायबर शिक्षा फॉर सुरक्षा या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

सर्वप्रथम प्रशालेचे प्राचार्य श्रीकांत वारुडे, उपप्राचार्य अतुल फावडे व समन्वय विभावरी थिटे यांनी प्रतिक्षा पांगे यांचे प्रशालेच्या वतीने स्वागत केले तदनंतर या कार्यशाळेची सुरुवात झाली. आपल्या व्याख्यानातून प्रतिक्षा पांगे यांनी सायबर गुन्हे, सोशल मीडिया, मोबाईल प्लिकेशन यातून सायबर क्राईम, होणारी अर्थिक फसवणूक या समस्या कशा निर्माण होतात. याचे ज्वलंत उदाहरणावरून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचबरोबर यातून आपण, आपले कुटुंब व समाज कसे सुरक्षित राहू शकते याची माहिती उपस्थितांना आपल्या मार्गदर्शनातून दिली.

ही कार्यशाळा प्रशालेत इयत्ता पाचवी ते दहावी विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली गेली होती. यामुळे विद्यार्थ्यांना मोबाईल फोन, सोशल नेटवर्किंग, वेब साईट वापर यातील समस्या व उपाययोजना याबद्दल यथोचित माहिती मिळाली व त्याबद्दल विद्यार्थ्यांमध्ये उत्साह व समाधान दिसून आले.

या कार्यशाळेसाठी सुत्रसंचलन दुर्गानाथ देशमुख यांनी केले तर आभार सहशिक्षक धिरज जाधव यांनी मानले.

ही कार्यशाळा प्रशालेचे प्राचार्य श्रीकांत वारुडे, उपप्राचार्य अतुल फावडे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत संपन्न झाली.

## येरमाळा पोलिसांकडून दोन फरार आरोपींना दोन दिवसात अटक

**येरमाळा, दि.२३ ऑगस्ट -**

येथील पोलीस ठाणे गुन्ह्यातील अनेक दिवसापासून दोन फरार आरोपींना दोन दिवसात अटक करण्याची कारवाई केली आहे.

याबाबत पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्ह्यातील मधील फरार आरोपी राजु सिद्धू शिंदे रा.समता नगर परांडा, (ता.परंडा) हा येरमाळा येथील बस स्थानक येथे असल्याबाबत गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली त्यावरुन बस स्थानक येरमाळा येथे जाऊन आरोपीचा शोध घेतला असता तो तेथून तेथे मिळून आला. सदर आरोपीस (ता.१९) अटक करण्यात आली आहे. तर पोलीस ठाणे येरमाळा गुन्ह्यातील मधील फरार आरोपी आपल्या उर्फ पप्पू शहाजी शिंदे राहणार लाडोळे (ता.बार्शी जि. सोलापूर) यालाही शोध घेवून येरमाळा बसस्थानक परिसरात ठाण्यात दखल गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

सदरील कामगिरी पोलीस अधीक्षक संजय जाधव अप्पर पोलीस अधीक्षक हसन गौहर उपविभागीय पोलिस अधिकारी संजय पवार यांचे मार्गदरशनाखाली सपोनी महेश क्षीरसागर, पोलीस उपनिरीक्षक निंबाळकर, पोकॉ डी. एन.पालके, पोकॉ सूर्यजीत कदम, पोलीस ठाणे येरमाळा यांनी पार पाडली आहे.

## महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त कृती समितीचे विविध मागण्यासाठी आंदोलन

### प्रलंबित मागण्या मान्य न झाल्यास ३ सप्टेंबर पासून महाराष्ट्रात एसटी बंद



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ ऑगस्ट -**

महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त समितीच्या वतीने एसटी परिवहन महामंडळ धाराशिव येथे निषेध आंदोलन करण्यात आले आहे.

गेल्या आठ वर्षापासून त्यांच्या विविध प्रलंबित मागण्यासाठी संघटनेच्या वतीने आंदोलन सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त कृती समितीची बैठक वीस तारखेला होणार होती पण ती बैठक अद्याप पर्यंत झालेली नाही.

ही बैठक वेळेत न लागल्यामुळे महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त समितीच्या वतीने निदर्शने आंदोलने करण्यात आले आहे तरीही बैठक लवकरात लवकर लावावी व प्रलंबित मागण्या लवकर पूर्ण व्हाव्या प्रलंबित मागण्या न पूर्ण झाल्यास येणाऱ्या ३ सप्टेंबर पासून महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त समितीच्या वतीने ३ सप्टेंबर पासून महाराष्ट्रात पूर्णपणे एसटी बंद आंदोलन करण्यात येईल असा इशारा आंदोलक राजेश काशीद यांनी दिला आहे.

यावेळी तात्यासाहेब रणखांब, बालाजी पाटील, सुदर्शन जाधव, सतीश धस, आप्पासाहेब दणके, दादासाहेब बनसोडे, राहुल वाघमारे, बालाजी कापसे, ओंकार कालेकर, कुलदीप सावंत यांच्यासह मोठ्या संख्येने कर्मचारी उपस्थित होते

## शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी चांद शेख यांची फेरनिवड

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२२ ऑगस्ट -**



तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी पत्रकार चांदसाहेब शेख यांची फेरनिवड करण्यात आली असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व गुणवत्ता वाढविण्यासाठी केलेल्या सकारात्मक कामाची पोहच पावती त्यांना पालक व ग्रामस्थांनी बहाल केली.

मंगळवार २० ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे पालक मेळावा घेऊन पालकांतुन सर्वप्रथम १० पालक सदस्यांची व उर्वरित ग्रामपंचायत सदस्य, ज्येष्ठ शिक्षक, शिक्षणप्रेमी नागरिक, विद्यार्थी प्रतिनिधी, मुख्याध्यापक अशी १५ जणांची समिती नियुक्त करण्यात आली. सर्वांच्या संमतीने शाळेत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण कलागुणांना वाव मिळावा व गुणवत्ता वाढावी यासाठी गेल्या दोन ते तीन वर्षांपासून सातत्याने प्रयत्नशील असणारे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पत्रकार चांदसाहेब शेख यांची फेरनिवड करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला व उपाध्यक्षपदी दिलीप जाधव यांची निवड करण्यात आली.

यापालक मेळाव्यास उपसरपंच गिरीश डोंगरे, ग्रामपंचायत सदस्य आदमशा फकीर, आप्पासाहेब जेटीथोर, विजय गरगडे यांनी सखोल मार्गदर्शन करून ही निवड पारदर्शक पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले. यावेळी मुख्याध्यापक डोलारे, पालक अच्युत कापसे, अमोल लबडे, किरण पारधे, मुकुंद सरडे, हसन शेख, निकम, शिक्षिका हेरकर, येरटे यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निम्न तेरणा उपसा सिंचन : निवडणुकीच्या तोंडावर विरोधकांकडून श्रेयवादासाठी केविलवाणा प्रयत्न : कोळगे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ ऑगस्ट -**

निम्न तेरणा उपसा सिंचन योजना दुरुस्तीच्या रु.११३ कोटीच्या अंदाजपत्रकास तात्रिंक सल्लागार समितीची मान्यता प्राप्त झाली आहे. आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या माध्यमातुन या कामाचा सातत्याने पाठपुरावा सुरु असून लवकरच यास मंजुरी मिळणार असल्याने नेहमीप्रमाणे निवडणुकीच्या तोंडावर विरोधकांकडून श्रेयवादासाठी केविलवाणा प्रयत्न केला जात असल्याची टिका भा.ज.पा. किसान मोर्चाचे पुर्व मराठवाडा संपर्कप्रमुख रामदास कोळगे यांनी केली आहे.

त्यांनी काढलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे, राज्यात २०१९ पासून जून २०२२ पर्यंत महाविकास आघाडीचे सरकार होते. ठाकरे सरकारच्या या अडीच वर्षाहुन अधिकच्या काळात या योजनेच्या दुरुस्तीचे साधे अंदाजपत्रक देखील तयार झाले नाही. त्यांचे सरकार असताना तेव्हा काहीच केले नाही.

केवळ राजकीय द्वेषापोटी विरोधकांकडुन योजना मंजुरीच्या अंतिम टप्प्यात असल्याने श्रेय घेण्यासाठी कांगावा केला जात आहे. याउलट भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून यासाठी प्रयत्न करण्यात आले.

सदरील योजनेच्या दुरुस्तीचे काम अतिशय किचकट होते. स्थापत्य, यांत्रीक व विद्युत या तीन वेगवेगळ्या विभागाकडुन संपूर्ण योजनेची पाहणी करून दुरुस्तीची अंदाजपत्रके तयार करण्यात आली.

तीन वेगवेगळ्या विभागाकडुन ती अंतीम करुन त्रुटी पूर्ततेसह कार्यकारी संचालक, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे पाठविण्यात आली. तदनंतर राज्यस्तरीय तात्रीक सल्लागार समीती, नासिक यांच्या मान्यतेने प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव शासनाला पाठविण्यात आलेला आहे. लवकरच यास मान्यता मिळणे अपेक्षित आहे.

तेरणा संघर्ष समीतीच्या नावाने काल घेतलेल्या पत्रकार परीषदेमध्ये सर्व महाविकास आघाडीशी संबंधितच सामील होते, असेही त्यात म्हटले आहे.



**धाराशिव :** अनुसूचित जाती, जमातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्यात यावे हा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल तात्काळ रद्द करण्यात यावा अशी मागणी रिपाइं (खरात) पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ राऊत यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देऊन मागणी करण्यात आली. यावेळी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धाराशिव जिल्हा तांडा समृद्धी योजनेच्या सदस्यपदी राणी राठोड



**कदेर, दि.२३ ऑगस्ट -**

महाराष्ट्र शासनाच्या संत सेवालाल महाराज बंजारा तांडा समृद्धी योजनेच्या धाराशिव जिल्हास्तरीय समितीवर अशासकीय सदस्य पदी राणी राठोड यांची निवड करण्यात आली आहे.

या निवडबद्दल कदेर गावचे सरपंच सतीश जाधव,पोलिस पाटील सुनील पाटील, माजी पोलीस हवालदार महादेव साखरे, कंवठा गावचे सरपंच, पंचायत समिती अधिकारी राऊत, नंदकुमार स्वामी याच्या कडुन सत्कार करण्यात आला.

जिल्हा अध्यक्ष संताजी चालुक्य यांच्या मार्गदर्शनाखाली राणी राठोड यांनी सर्वसामान्य जनतेचे प्रश्न, बंजारा समाजाचे सर्वांगीण विकास व्हावा यासाठी ते सतत प्रयत्न करीत असतात. त्यांच्या एकंदरीत कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाच्या वतीने ही निवड केली आहे. राणी राठोड हे उमरगा तालुक्यातील कदेर येथील रहिवासी असून ते सर्वसामान्य कुटुंबातील भाजपाचे निष्ठावंत बंजारा समाजातील कार्यकर्ता म्हणून त्यांची धाराशिव जिल्हाभरात ओळख आहे. धाराशिव जिल्ह्यात या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी बंजारा तांडा वस्ती घोषित करणे, गावठाण जाहीर करणे तांड्याला महसुली गाव घोषित करण्याची कार्यवाही करणे ग्रामपंचायत स्थापन करण्याची कार्यवाही करणे व इतर अनुषंगिक कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी धाराशिव यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीवर तिन (३) वर्षाकरीता अशासकीय सदस्य म्हणून राणी राठोड यांची निवड केली आहे.

## भैरवनाथ उद्योग समूहाच्या माध्यमातून शेतरस्त्याच्या कामाला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२३ ऑगस्ट -**

महाराष्ट्र राज्याचे आरोग्य कुटुंब कल्याण मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.तानाजीराव सावंत यांच्या आदेशावरून धाराशिव जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांच्या संकल्पनेतून भैरवनाथ उद्योग समूहाच्या वतीने परंडा-भूम-वाशी विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक खेड्यापाड्यात 'जिथे नाही कोणी, तिथे आम्ही' हे ब्रीदवाक्य घेऊन सावंत कुटुंबीय शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहे.



ग्रामीण भागातील वाडी, वस्ती तांड्याकडे जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नसेल त्या ठिकाणी स्वखर्चातून भैरवनाथ उद्योग समूहाच्या माध्यमातून तात्काळ शेत रस्ते बनवून देण्याचे आदेश पालकमंत्री डॉ तानाजीराव सावंत यांनी दिले आहेत. भैरवनाथ उद्योग समूहाच्या माध्यमातून आजमितिला ग्रामीण भागातल्या दुर्गम क्षेत्रात दळणवळणाची मोठी सुविधा शेतकऱ्यांना मिळत आहे.

याचा लाभ दुर्गम क्षेत्रातील विद्यार्थ्यांना देखील होत आहे. विधानसभा मतदारसंघातील अनेक भागात शेत रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. बुधवारी मलकापूर शिवारातील शेतकऱ्यांनी धनंजय सावंत यांची भेट घेऊन ऐन पावसाळ्यात वाडी वस्त्याकडे जाण्यासाठी रस्ता नाही. चिखल तुडवत विद्यार्थ्यांना शाळेत जावे लागते.

सदरील शेत रस्ता बनवणे अत्यंत गरजेचे असल्याचे सावंत यांना सांगितले. क्षणाचाही विलंब न लावता सावंत यांनी भैरवनाथ उद्योग समूहाच्या यंत्रणेला शेत रस्ता बनवून देण्याच्या सूचना केल्या.

सावंत यांच्या सुचनेनुसार भैरवनाथ उद्योग समूहाच्या कर्मचाऱ्यांनी विलंब न लावता मलकापूर येथे जाऊन रस्त्याची पाहणी केली.

गुरुवारी धाराशिव जिल्ह्याचे जिल्हा समन्वयक तथा भुम परंडा वाशी विधानसभा मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे अध्यक्ष गौतम लटके, शिवसेना तालुका संघटक तथा संजय गांधी निराधार योजनेचे तालुका प्रमुख जयदेव गोफणे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आरोग्य विभाग प्रमुख बालाजी नेटके, अनाळा ग्रामपंचायत उपसरपंच कल्याण शिंदे, आनाळा सर्कल आरोग्य मित्र सर्कल प्रमुख संतोष जहांगीरदार, रत्नापुर विद्यमान सरपंच मारकड, आनाळा शाखा प्रमुख दशरथ क्षिरसागर, शाखा प्रमुख मिठु कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत शेत रस्त्याच्या कामाचा प्रारंभ श्रीफळ फोडून करण्यात आला.

यावेळी मलकापूर युवा सेना प्रमुख हावसराव हिवरे, अतुल सरवदे, पांडुरंग सरवदे, दत्ता ढवळे, पांडुरंग ढवळे, परशुराम ढवळे, मारती कुतवाळ, नवनाथ सरवदे, नागेश चोरगे, बाबुराव हिवरे, रमेश बिडवे, बाबासाहेब बिडवे, सुधीर बिडवे, कल्याण हिवरे, अंगद हिवरे, गोपाळ खोसे, संतोष खोसे, अशोक सरवदे, भाजपाचे तुकाराम तेरकर, आण्णासाहेब भोरे, प्रल्हाद सरवदे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# नाशिकहून हिंगोलीत आलेल्या अभियंत्याचा मृतदेह सापडला पोराळा तलावात

## हिंगोली ग्रामीण पोलिसांकडून आरोपीचा तपास सूरू



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ ऑगस्ट**

नाशिक येथून हिंगोली येथे कामाच्या निमित्ताने आलेला तरूण अभियंता बेपत्ता झाल्याची माहीती त्याच्या कुटुंबियांनी ग्रामीण पोलिसांना दिल्यानंतर पोलिसांनी माहीतीच्या आधारे पारोळा शिवारात शोध मोहीम राबवली असता या तरूण अभियंत्याच मृतदेह पारोळा तलावात आढळला असून पोलिसांनी उत्तरीय तपासणीसाठी मृतदेह जिल्हा सामान्य रूग्णालयात दाखल केला असून आरोपीचा शोध पोलिसांचे पथक घेत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार नाशिक येथील तरूण अभियंता देवेंद्र प्रकाश बुरड वय ३१ रा यशोदा नगर पेठरोड, नाशिक हा बुधवार दि २१ ऑगस्ट रोजी सकाळी नाशिक येथून हिंगोली येथे कामानिमित्त आला होता. शहरातील एका लॉजमध्ये त्याने रूम बुक केली. त्यानंतर त्या खोलीतच त्याने बुधवारी मुक्काम केला.

दरम्यान, गुरूवारी सकाळच्या सुमारास त्याने एक ऑटो ठरवून हिंगोली ते कनेरगाव नाका मार्गावर पारोळा फाटा येथे गेला. त्या ठिकाणी ऑटो चालकास थांबण्यास सांगितले. त्यानुसार ऑटो चालकाने सुमारे एक ते दीड तास त्याची वाट पाहीली मात्र देवेंद्र परत आलाच नाही. तर त्याच्या नातेवाईकांनीही त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्याचा मोबाईल स्वीच ऑफ होता. त्यामुळे संशय वाढल्याने त्याच्या नातेवाईकांनी हिंगोली ग्रामीण पोलिसांना माहीती दिली. ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोनि विजय रामोड, जमादार आकाश पंडीतकर यांच्या पथकाने तातडीने त्याचा शोध सुरू केला. याशिवाय सायबर सेलचे सपोनि शिवसांब घेवारे यांनीही देवेंद्र याच्या मोबाईलचे लोकेशन काढण्याचे प्रयत्न केले. दरम्यान, पोलिसांना देवेंद्र यास पारोळा पाटीकडे सोडणाऱ्या ऑटो चालकाची चौकशी केली. त्याने देवेंद्र यास पारोळा पाटीजवळ सोडल्याचे सांगितले. पोलिसांच्या पथकाने ग्रामस्थांच्या मदतीने देवेंद्रचा शोध सुरू केला असता त्याचा मृतदेह पारोळा येथील तलावात आढळला. त्यानंतर पोलिसांनी त्याच्या लॉजवरील खोलीत पाहणी केली असता त्याचे शर्ट पंख्याला लटकलेले पोलिसांना दिसून आले. याप्रकरणी पोलिसांनी पुढील प्रक्रिया सुरू केली आहे.

# डिग्रस कऱ्हाळे येथे २४ वर्षीय तरूणाचा संशयास्पद मृत्यू

## पोलिस अधीक्षक कोकाटे यांची घटनास्थळाला भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ ऑगस्ट**

तालुक्यातील डिग्रस कऱ्हाळे येथे २४ वर्षीय तरूणाचा मृतदेह शुक्रवार दि २३ ऑगस्ट रोजी सहा वाजण्याच्या सुमारास घरासमोरच आढळून आला आहे. त्या तरूणाचा संशयास्पद मृत्यू असून पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्यासह पथकांनी घटनास्थळाला भेट दिली आहे.

डिग्रस कऱ्हाळे येथील तरूण माधव बाबुराव गोरे हा त्याच्या कुटुंबियांसह राहतो. दीड वर्षापूर्वीच त्याच्या वडीलांचे निधन झाले असून सध्या आई, भाऊ आणि वहिणी असा परिवार आहे. दोघे भाऊ शेती करतात. गुरूवारी रात्री सर्वजण जेवण करून झोपले होते. त्यानंतर मध्यरात्री घराचा दरवाजा वाजविल्याचा आवाज आला मात्र कोणीही दरवाजा उघडला नाही. दरम्यान, आज सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास माधव याचा मृतदेह घराच्या समोरच आढळून आला. या घटनेची माहीती मिळताच गावकरी घटनास्थळी दाखल झाले. तर पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील, पोनि विजय रामोड, सपोनि शिवसांब घेवारे, उपनि विक्रम विठूबोने, जमादार अस्लम गारवे, सुधीर ढेंबरे यांच्या पथकाने घटनास्थळी भेट दिली. माधव याचे हातपाय बांधलेले होते तसेच पायावर आणि पाठीवर व्रण होते असे प्रत्यक्षदर्शीने सांगितले. मयत माधव याचा संशयास्पद मृत्यू असल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी तातडीने श्वान पथकाला पाचारण केले मात्र श्वान पथक घटनास्थळावरच थांबले. त्यानंतर पोलिसांनी गावातील काही दुकानासमोर असलेल्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली आहे. तसेच गावातून माहीती घेण्याचे काम सुरू आहे. माधव याचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी हिंगोलीच्या सामान्य रूग्णालयात आणला असून त्यानंतरच मृत्यू नेमका कसा झाला हे स्पष्ट होणार आहे.

# बदलापूर अत्याचार प्रकरणी आ. सातव यांच्या नेतृत्वात कळमनुरीत निदर्शने



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ ऑगस्ट**

बदलापूरमध्ये घडलेल्या या घटनेविरोधात काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली आहे. बदलापूर येथील एका प्रख्यात शाळेत शिकत असलेल्या ४ वर्षांच्या दोन मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ या प्रकरणी आरोपीला फाशी देण्याची मागणीसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या उपाध्यक्षा आ. प्रज्ञा सातव यांच्यासह शेकडो महिलांनी कळमनुरीत सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली.

शुक्रवार दि २३ ऑगस्ट रोजी कळमनुरी येथील उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेना पाठाविण्यात आलेल्या निवेदनात आरोपींवर जल्दगति न्यायलयात खटला चालवून फाशी शिक्षा देण्यात यावी आशी मागणी करण्यात आली यावेळी महिला काँग्रेस जिल्हाध्यक्ष वनिताताई गुंजकर, उपाध्यक्षा सुवर्णा गाभणे,जयश्री सातव, अर्चना जाधव, छाया गाभणे, विजयमाला डोके, रंजना खंदारे, जयश्री मोरे, मनिषा गायकवाड, सिंधु जांबुतकर, कुसुम काटकर, लताबाई गुंजकर, शुभांगी खंदारे, आशा खंदारे, अनिता थोरात, अमिना पठाण, नंदा गुंजकर, चंदा क्षिरसागर यांच्यासह मोठ्या संख्येने महिला काँग्रेसच्या पदधिकारी यांची उपस्थिती होती.

यावेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना आ. प्रज्ञा सातव म्हणाल्या की, बदलापुरातील अशा विकृत मानसिकतेच्या नराधमांना कायमची अद्दल घडवून समाजात अशी विकृती पुन्हा जन्म घेऊ नये यासाठी शासनाने कठोर पावले उचलुन योग्य ते उपाययोजना करुन नागरिकांना भयमुक्त करावे आणि राज्य सरकारने लोकसभा निवडणुकीतील भाजपचे उमेदवार उज्वल निकम यांची या प्रकरणी विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली आहे ते पीडितेला न्याय मिळवून देण्याऐवजी भाजप नेत्याला पाठीशी घालतील अशी शंका निर्माण झाली आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून पीडित मुलींना न्याय मिळवून देण्यासाठी विशेष सरकारी बदलून दुस-या निष्पक्ष वकील आणि पोलीस अधिका-यांची नियुक्ती करावी. या संदर्भात तात्काळ कारवाई न केल्यास काँग्रेस पक्षाच्यावतीने पुढील काळात अधिक तीव्र आंदोलन करण्यात येईल अशा इशारा आ. प्रज्ञा सातव यांनी दिला.




**हिंगोली– येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या डीपीसी सभागृहात बेनीफिटस फॉर स्टेकहोल्डर्सच्या संदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर**

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत तत्काळ नियुक्त्या द्या– जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ ऑगस्ट**

ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी केलेल्या, १८ ते ३५ वयोमर्यादा असलेल्या तसेच आवश्यक किमान शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या पात्र उमेदवारांना मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत त्यांना तात्काळ नियुक्त्या देऊन युवा कार्य प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनी सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांना दिले आहेत.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून जिल्ह्यातील बेरोजगार युवकांना स्थानिक पातळीवर शासकीय कार्यालयात काम करण्याच्या संधीसोबत मानधन देण्यासाठी योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा आज जिल्हाधिकारी परदेशी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेतला. त्यावेळी जिल्हाधिकारी परदेशी बोलत होते.जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांनी कौशल्य विकास विभागाकडून पात्र इच्छूक उमेदवारांची यादी उपलब्ध करुन घ्यावी. त्या पात्र उमेदवारांना दूरध्वनी करुन बोलावून घ्यावे. त्यांच्या कागदपत्राची तपासणी करुन जास्तीत जास्त युवकांना युवा कार्य प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत तात्काळ नियुक्त्या देण्यात याव्यात व त्यांना रुजू करुन घ्यावेत. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पाठविण्याचे निर्देशही सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांना दिले आहेत.राज्य शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली असून, या योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त बेरोजगार युवक-युवतींना स्थानिक पातळीवर रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याचा मुख्य हेतू आहे. तसेच शासकीय कार्यालयांमध्ये काम करण्याच्या संधीसोबत कार्य प्रशिक्षण मानधन देण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले. त्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागाच्या संकेतस्थळावर नावनोंदणी करणे अनिवार्य आहे, असे जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनी सांगितले.

या आढावा बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, सहायक आयुक्त डॉ. राजपाल कोल्हे, शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर, संदीप सोनटक्के, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलाश शेळके यांच्यासह अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### औंढ्यात उपविभागीय अधिकाऱ्यांचा सत्कार



औंढा नागनाथ– वसमत येथे नव्याने रुजू झालेले उपविभागीय अधिकारी विकास माने यांचा गुरुवारी वकील संघाच्यावतीने औंढा नागनाथ तहसील कार्यालय येथे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. रामजी कांबळे, उपाध्यक्ष विनोद मूखमहाले, ॲड विजय नागरे, ॲड एस एस कदम, ॲड बाळासाहेब कुटे, ॲड मुंजाभाऊ मगर, ॲड प्रदीप लोंढे, ॲड स्वप्निल मुळे, ॲड विजय घनसावंत, ॲड माधव हाके, ॲड मिरा सत्वधर, ॲड सोळंके आदींची उपस्थिती होती.

### महिला राशन दुकानदारास मारहाण करणाऱ्याविरूध्द कारवाई करण्याची संघटनेची मागणी



हिंगोली– तालुक्यातील दुर्ग धामणी येथील महिला राशन दुकानदार श्रीमती पुष्पा भिवाजी ठोके या काही कामकाजासाठी दि २१ ऑगस्ट रोजी तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात आल्या असता काहीजणांनी त्यांना मारहाण केली. तसेच स्वस्त धान्य दुकानाची तक्रार करून त्रास देण्याची धमकी दिली. मागील अनेक वर्षापासून गावगुंड त्यांना त्रास देत आहेत. त्यांनी ग्रामीण पोलिस ठाण्यात काही जणांविरूध्द तक्रार दिल्याने त्याचा राग मनात धरून त्यांना मारहाण करण्यात आली. शासकीय कार्यालयात येऊन मारहाण करण्याची हिंमत या गावगुडांनी केली आहे. या आरोपीविरूध्द कडक कायदेशीर कारवाई करावी तसेच या घटनेचा स्वस्त दुकानदार संघटनेच्यावतीने तीव्र निषेध करीत जिल्हा पुरवठा अधिकारी, पोलिस अधीक्षक, तहसीलदार यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनावर जिल्हाध्यक्ष भिकुलाल बाहेती, शिवाजी देशमुख, सचिव अशोक काळे, फारूख खान पठाण, नागेश बांगर, शाहनवाज बाबु गौरी, हरिश्चंद्र पोले, संतोश राजगोरे, कैलाश कंधारकर, गजानन गिरे, नवनाथ कानबाळे, सिकंदर गौरी, एल जी घुगे, उत्तम इंगळे, भागवत पाटील, मधुकर देशमुख आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# महाविकास आघाडीच्यावतीने आज महाराष्ट्र बंदची हाक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ ऑगस्ट**

बदलापूर येथील घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीच्यावतीने दि २४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली असून महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक यांना निवेदन दिले आहे.

राज्यातील बदलापूर येथील घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीने महाराष्ट्र बंदची हाक दिली असून जिल्ह्यातही याचे पडसाद उमटणार आहेत. महाविकास आघाडीच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले आहे. यावेळी उबाठा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गोपु पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिलीप देसाई, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण, अनिल पतंगे, मनिष आखरे, संदेश देशमुख, सपाचे जिल्हाध्यक्ष खलील बेलदार, शेळके आदींची उपस्थिती होती.

# माथा येथील रास्तभाव दुकानदाराविरोधात तहसीलदारांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, २३ ऑगस्ट**

तालुक्यातील माथा येथील रास्त भाव दुकानदार लाभार्थ्यांना अंगठा घेऊन धान्य देत नसल्याने माथा येथील ग्रामस्थांनी तहसीलदार हरीश गाडे यांना निवेदन सादर केले.

माथा येथील रास्त भाव दुकानधारक रामप्रसाद तुळशीराम राठी यांनी दिपावली पासून धान्य वाटप केले नसल्याचे सांगितले. त्यामुळे या प्रकरणाची तात्काळ चौकशी वरिष्ठाकडून करण्यात यावी. या प्रकरणात तथ्य असेल तर हे प्रकरण खरच गांभीर्याने घेण्याचे आहे. दीपावली पासून राशन मिळत नसेल तर तेव्हापासून उचललेले राशन कुठे गेले? या गोष्टींची पुरवठा अधिकाऱ्याकडूनचौकशी होणे गरजेचे आहे कारण या निवेदनावर अनेक लाभार्थ्यांच्या स्वाक्षरीआहेत. सदर दुकानदाराचे वाटप रजिस्टर व दिलेल्या मालाचे चालन इत्यादी गोष्टी तपासून सदरील माल कोणाला दिला याची शहानिशा करावी अशी मागणी माथा येथील एकनाथ लिंबाजी सांगळे यांच्यासह बन्सी विश्वनाथ सांगळे, महादेव रामजी सुतार, नारायण गणपतराव घुगे, रामराव दासू जाधव यांच्यासह एकूण वीस ते पंचवीस जणांच्या स्वाक्षऱ्या आहेत. ग्रामस्थांनी लाभार्थ्यांना धान्य उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. यावेळी सर्व ग्रामस्थांकडून औंढा तहसील कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात आले.

# पुरवठा विभागाच्या पथकाची चाहूल लागताच राशन दुकानदाराने काढला पळ



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ ऑगस्ट**

तालुका पुरवठा विभागाचे पथक आपल्या दुकानाला भेट देवून पाहणी करणार असल्याची कुणकुण लागताच दुर्गधामणी येथील रेशन दुकानदाराने चक्क दुकानाला कुलूप लावून काढता पाय घेतल्याचा प्रकार २२ ऑगस्ट रोजी घडला. मग काय अशावेळी आलेल्या अधिकाऱ्यांना आलेल्या पाऊली आपले कार्यालय गाठावे लागले. या प्रकारामुळे मात्र ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला.

दुर्गधामणी येथील शिधापत्रिकाधारकांना धान्याचे नियमित वाटप होत नसल्याच्या तक्रारी तहसील प्रशासनाकडे करण्यात आल्या. त्यावरून तपासणीकरीता नायब तहसीलदार फाळेगावकर, पुरवठा विभागाचे अनिल पाघिरे, तलाठी घोंगडे, मंडळ अधिकारी सोनाली आरगडे, ग्रामसेवक विनोद ठोके यांचे पथक २२ ऑगस्ट रोजी दुपारी १२:३० वाजेच्या सुमारास दुर्गधामणीत दाखल झाले. यासंदर्भात रेशनदुकानदार पुष्पा ठोके यांनाही सूचना करण्यात आली होती. परंतु रेशनदुकानदार गैरहजर होत्या. तर रेशन दुकानही कुलूपबंद होते. कुलूपबंद रेशनदुकानाचा पंचनामा पथकाने ग्राम पंचायत कार्यालयात ग्रामस्थांचे म्हणणे ऐकूण घेतले. गोरगरिबांना नियमित आणि वेळेत धान्य मिळणे गरजेचे असताना दुकानदाराकडून धान्याचे वाटप होत नाही, अडवणूक होते, असे म्हणणे ग्रामस्थांनी पथकासमोर मांडले. यावेळी काही ग्रामस्थांनी रेशनदुकानदाराच्या कारभारावर रोष व्यक्त करीत चौकशी करून तातडीने कारवाई करावी, अशी मागणी केली. यावेळी सरपंच ताईबाई एकनाथ पाचमसे, उपसरपंच अमेरअली पठाण, पोलिस पाटील अंजली इंगोले यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदेडकरांना श्रावणात महाशिवपुराण कथा श्रवणाचे भाग्य - खा. अशोक चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,२३ ऑगस्ट -**

हिंदू धर्मियांमध्ये अत्यंत पवित्र असलेल्या श्रावण महिन्यात नांदेडमध्ये महाशिवपुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कथाकार पंडित प्रदीपजी मिश्रा यांच्या सुमधूर वाणीतून महादेवांच्या कथेचे श्रवण करण्याचे भाग्य नांदेडकरांना मिळतय असे भावोदगार माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी काढले.महाशिवपुराण कथा सोहळ्याच्या शुभारंभप्रसंगी संबोधन करताना ते बोलत होते.

आपल्या स्वागतपर छोटेखानी भाषणात बोलताना खा. चव्हाण म्हणाले की , पंडित मिश्रा यांच्या वाणीतून महाशिवपुराण कथा ऐकण्यासाठी दुरदुरुन भक्तगण नांदेड मुक्कामी आले आहेत. या सर्व भक्तांचे नांदेडकरांच्या वतीने मी त्यांचे स्वागत करतो. या मोदी



मैदानावर अनेक विराट सभा झाल्या आहेत पण या सर्व सभापेक्षा वेगळी भक्तीच्या शक्तीची अलोट गर्दी इथे पहायला मिळते आहे. पवित्र श्रावण महिन्यात मिश्राजींच्या सुमधूर वाणीतून आपल्याला महाशिवपूराण कथा ऐकायला मिळणे, हे आपले भाग्य आहे. त्यामुळे या सोहळ्यासाठी इथे लाखोंचा जनसमुदाय जमला आहे. प्रलयाच्या वेळी महादेवच तारणहार असणार, हा भक्तांचा विश्वास असल्याने महाराष्ट्रातील प्रत्येक घरातील देव्हाऱ्यात शिवलिंगाची आवर्जून पूजा होते, असे खा. चव्हाण पुढे म्हणाले.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर शिवपुराणाचा प्रचार आणि प्रसार करण्याचे महत्वाचे धार्मिक कार्य पं. प्रदीप मिश्रा यांनी केले आहे. या शिवमहापुराण कथेचे संयोजक शिवराज नांदेडकर आणि प्रशांत पातेवार यांच्यामुळे नांदेडकरांसाठी हा योग जुळून आल्याचे सांगत खासदार चव्हाण यांनी या दोन्ही कुटुंबियांचे विशेष आभार मानले. दरम्यान, अफाट लोकप्रियतेचे धनी असलेले पंडित मिश्रा यांच्या महाशिवपुराण कथेच्या श्रवणासाठी नांदेडमध्ये लाखोंचा जनसमुदाय उसळला आहे.

## किनवट- मांडवा -नागझरी रस्ता अतिक्रमणमुक्त, अंदाजपत्रकानुसार करा



**तभा वृत्तसेवा**
**किनवट,२३ ऑगस्ट -**

शहरातील रेल्वे गेट ते मांडवा नागझरी व पुढे हाच रस्ता आदिलाबाद (तेलंगणा )ला जोडला जाणार आहे, या महत्वपूर्ण राज्य रस्त्याची अवस्था अतिशय खराब झाली असल्याने आमदार भीमराव केराम यांच्या प्रयत्नातुन या कामासाठी निधी मिळाला असल्याने सां.बा. कार्यालयांने काम चालू केले आहे.परंतु या महत्वाच्या वर्दळीच्या रस्ताचे काम थातूरमातूर पधतीने होवू नये तसेच सुमारे सहा ते सात कोटी रुपय मंजुर असलेले हे काम दर्जेदार ,रुंद व नियोजनपूर्वक अंदाजपत्रकानुसार करण्यात यावेअशी मागणी जनतेतून व्यक्त केले जात आहे.

किनवट शहरातुन पुर्व कडे जाणाऱ्या सरस्वती महाविद्यालय परिसरातील सरस्वती कॉलनी, हेडगेवार कॉलनी ,जिजामाता कॉलनी इतर कॉलन्या सहित नागझरी ,वंजारवाडी , मांडवा,घोगरवाडी, ई. गावांना जाणारा हा महत्त्वाचा रस्ता असल्याने वाहतूक मोठ्या प्रमाणावर चालू असते .किनवट शहरातील नगरपरिषद डि. पी.प्लान नुसार रेल्वे गेटपासुनपुढे जाणारा हा रस्ता २४ मीटर रुंदीचा आहे, परंतु प्रत्यक्षात हा रस्ता उतर बाजूला असलेल्या शासकीय वनविकास महामंडळ कार्यालयाने अतिक्रमण करून तारफिनीशीगं व गेट लावल्याने अरुंद झाला आहे. त्यामुळे वाहतूकीत अडथळे येत आहेत. या रस्त्यावर दहा फुटापासुन ते पंचवीस फुट भर रस्त्यावर या शासनाच्याच कार्यालयाने अतिक्रमण केले आहे.परिसरातील नागरिक आणि विकास प्रेमी काही लोकांनी याबाबत आमदार भीमराव केराम यांच्या कडे तक्रार करुन ही बाब निदर्शनास आणून दिली आहे.

त्यांनी सां. बा. ला सुचना दिलेल्या आहेत. बांधकाम विभागाच्या अंतर्गत खाजगी कंत्राटदाराने या रस्त्याचे काम चालू केले आहे.परतुं जागेवर कामाचे फलक लावले नसल्याने कामाची माहीती जनतेला मिळत नसल्याने काम बोगस होणयाची शक्यता वर्तविण्यात येत आहे.या कामाच्या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाचा अभियंता अथवा कर्मचारीवर्ग जागेवर दिसुन येत नाही. त्यामुळे हया रस्त्याचे कामाबाबत शंका व्यक्त करण्यात येत आहे .वनविकास महामंडळ या कार्यालयाच्या मुजोर परशासनाने रस्त्यावर गेट लावल्याने अत्यंत अरुंद रस्ता झाला आहे. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम कार्यालयाला शहरातील नागरिक आणि कार्यकर्त्यांनी निवेदनही दिली आहेत. परंतु सां.बा. कार्यालयाने अतिक्रमणे काढण्यासाठी अद्याप कोणतीही कारवाई केलेली नाही. भुमीअभिलेख कार्यालयाकडे रस्ता मोजून देण्याबाबत अर्ज देण्यात आल्याचे सांगून वेळ मारून नेत आहेत.रस्ता रुंद करून अदांजपत्रकानुसार आवासीय क्षेत्र असलेल्या दक्षिणेकडे सी.सी.नाली व उतरेकडे नाली खोदकाम करण्यात येणार होते. त्यानंतरच रस्ताचे काम चालु केले जाणार होते. परंतु तसे न करता रस्त्याचे काम चालु केले आहे.परंतु अगोदर या रस्त्यावरील अतिक्रमण हटवून रस्ता रुंद करण्यात यावे .त्या नतंरच रस्त्याचे काम करावे.तसेच रस्त्याचे काम दर्जेदार व अंदाजपत्रकानुसार करावे . कामाच्या ठिकाणी कामाचे सविस्तर नोंद असलेले फलक जनतेच्या माहीतीसाठी अगोदर लावण्यात यावे अशीही मागणी केली जात आहे.नसता सां.बां.प्रशासनाविरुद्ध तीव्र आंदोलन करण्यात येईल असा ईशारा जनतेतून देण्यात येत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### भोकर तालुका सरपंच संघटनेच्या अध्यक्षपदी मारोती पाटील भोंबे

**भोकर-**भोकर तालुका सरपंच संघटनेची नूतन कार्यकारिणी घोषित करण्यात आली असून सरपंच संघटनेच्या तालुका अध्यक्षपदी मारोती पाटील भोंबे यांची तर उपाध्यक्षपदी राघोबा पाटील सोळंके यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. ग्रामस्तरावर सरपंच म्हणून काम करित असताना गावातील समस्या शासन स्तरावर मांडण्याकरिता संघटन महत्वाचे असते यासाठी यापूर्वीची कार्यकारिणी अध्यक्ष माधव अमृतवाड असलेली बरखास्त करण्यात आली होती. त्यानंतर १८ ऑगस्ट रोजी हॉटेल गणराज रिसॉर्ट येथे सरपंचांची बैठक घेऊन नूतन कार्यकारीनी निवडण्यात आली यावेळी बिनविरोध निवड करण्यात आली अध्यक्षपदी मारोती पाटील भोंबे, उपाध्यक्ष राघोबा पा. सोळंके, सचिव मोहन राठोड, सहसचिव दिलीप रायभोळे सल्लागार सुरेश पा. कल्याणकर, आनंदराव पा. रावणगावकर, जयवंतराव खूपसे, रमेश संगपवाड, सत्यनारायण कांबळे आदींची निवड करण्यात आली.

### सोलार तज्ञ अतुल देशमुख यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

**नांदेड-**शहरातील सोलार क्षेत्रातील अव्वल वितरक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आरोही सोलारचे संचालक श्री अतुल देशमुख यांनी महाराष्ट्राचे




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत वर्षा बंगल्यावर दि.१६ ऑगस्ट रोजी सदिच्छा भेट घेतली व सोलर संदर्भातल्या .विविध विषयावर चर्चा केली यावेळी त्यांनी सोलार वितरकांच्या तांत्रिक अडचणींकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.आरोही सोलार ही संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मागील सात वर्षापासून सर्वात उत्कृष्ट पद्धतीने सोलार प्रोजेक्ट कम्पलेट करणारी एकमेव एजन्सी आहे आणि मराठवाड्यातील पहिली सोलर मेंटनस एजन्सी आहे ज्याठिकाणी सोलार ग्राहकांना अनेक अडचणीवर त्वरीत तत्परतेने सेवा दिली जाते व त्याबरोबरच सोलार संदर्भातील विविध समस्यांवर तातडीने निराकारण केले जाते. आरोही सोलर एजन्सीचा सोलार क्षेत्रामध्ये सक्सेस रेट शत प्रतिशत असून लुम सोलार या भारतातील सर्वात मोठ्या सोलार कंपनीचे सोलार अंत्यत वाजवी दरात त्यांच्याकडे उपलब्ध असून ते लुम सोलार कंपनीचे अधिकृत मराठवाडा सुपरस्टॉकीस्ट म्हणून कार्यरत आहेत.

### गोविंदराव तमशेट्टे यांचे निधन

**नांदेड-**मौजे चांडोळा,ता.मुखेड येथील जेष्ठ नागरिक गोविंदराव पिराजी तमशेट्टे यांचे वृध्दापकाळाने दि.२३ ऑगस्ट रोजी निधन झाले.त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले,सुना,दोन मुली,जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.जि.प.सहशिक्षक हाणमंत तमशेट्टे(कर्ला),प्रभाकर तमशेट्टे(नरसी), राजू तमशेट्टे,मैनाबाई,शिवबाई यांचे ते वडील होत.

### त्र्यंबकराव वनसागर यांचे निधन

**नांदेड-**येथील शगुन शिटी भागातील प्रतिष्ठित जेष्ठ नागरिक त्र्यंबकराव



वनसागर यांचे शुक्रवार दिनांक २३ ऑगस्ट रोजी पहाटे दुःखद निधन झाले . त्यांची अंत्ययात्रा शगुन सिटी, जुना कौठा त्यांचे राहते घर येथून अंत्ययात्रा निघणार आहे . दिनांक २३ ऑगस्ट शुक्रवार रोजी दुपारी तीन वाजता गोवर्धन घाट येते अंत्यविधी होणार आहे . त्र्यंबकराव वनसागर हे डॉक्टर तुषार वनसागर व डॉ विशाल वनसागर यांचे वडील होते . कै.त्र्यंबकराव वनसागर नांदेड जिल्हा भावसार समाज कार्यकारणीती माजी सचिव व विविध पदावरती सामाजिक कार्य केले . त्यांनी केलेल्या कार्याची उणीव आपणास जाणवेल एक सच्चा कार्यकर्ता हरपल्याचं दुःख होत आहे अशी भावपूर्ण श्रद्धांजली त्यांना नांदेड जिल्हा भावसार समाज कार्यकारणी याच्या वतीने वाहण्यात आली.

## एकल प्लास्टिकच्या विरोधात न.पा.ची दुसऱ्या दिवशीही धडक कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,२३ ऑगस्ट -**

केंद्र सरकार व महाराष्ट्र शासन यांच्या पर्यावरण विभागाच्या आदेशान्वये पर्यावरणास घातक असलेल्या एकल प्लास्टिक चा होत असलेल्या भरमसाठ वापराबद्दल कुठेतरी त्याच्यावर अंकुश लावण्याकरिता धडक मोहीम राबविण्याचे आदेश प्राप्त झाल्यानंतर हदगाव नगर परिषदेचे मुख्याधिकारी नितीन लुंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक प्रमुख प्रवीण मंगनाळे, प्रणाली मुजमुळे , शेख अजीम ,श्रीकांत चव्हाण, सय्यद शादुल , रवी राठोड, सिद्धार्थ पंडित, सुरेश गिरबिडे या पथकातील कर्मचाऱ्यांनी सलग दोन दिवस दि.२२ व दि.२३ ऑगस्ट रोजी हदगाव शहरांमध्ये असलेल्या किराणा दुकान, बेकरी ,बिकानेर या ठिकाणी धाड टाकत एकूण बंदी असलेल्या ९५ किलो प्लास्टिक पिशव्या व १५००० रु. दंड यावेळेस आकारण्यात आला.

सामान्य जनता दैनंदिन जीवनात गरजेपेक्षा जास्त प्लास्टिक वापरतो. चांगले पर्याय उपलब्ध असूनही आपण सवयीमुळे प्लास्टिक एकल पिशव्या वापरत असतो. या प्लास्टिक पिशव्या वायू प्रदूषण वाढविण्याचे प्रमुख कारण आहे. या पिशव्या नदी, नाले आणि समुद्रात पोहोचतात आणि त्यात राहणाऱ्या प्राण्यांचे तसेच कचऱ्याच्या ढिगारावर असणाऱ्या पिशव्यांमुळे अनेक प्राण्यांचे मृत्यूचे कारण ही बनतात म्हणूनच प्लास्टिक पिशव्यांपासून मुक्त होण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र सरकार राज्य सरकार यांच्या विरोधात कडक मोहीम राबविण्यात येत आहे. किमान जनतेने तरी आता जागरूकता बाळगून ही आपली जबाबदारी आहे असे समजून एकल प्लास्टिक चा वापर करू नये तसेच प्रतिबंधित असलेल्या पिशव्या प्रथम आढळल्यास पाच हजार रुपये दंड आणि जर का तोच दुकानदार चौथ्यांदा आढळल्यास त्याच्यावर गुन्हा सुद्धा दाखल होणार असून ही मोहीम दर महिन्यात राबविण्यात येणार असल्याचे सुद्धा पथक प्रमुख प्रवीण मंगनाळे यांनी दिली.

## डॉ.अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त सत्यपाल महाराजांचा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,२३ ऑगस्ट -**

लोकशाहीर साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त नायगाव तालुक्यातील शेळगाव गौरी येथे आज दि.२४ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजता सप्तखंजेरीवादक महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचा कार्यक्रम आणि आर. टी. ची स्थापना करण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेल्या मान्यवरांचा जाहीर सत्कार सोहळा आमदार राजेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमास परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान सरपंच तथा प्राचार्य मनोहर तोटरे व जयंती मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



शेळगाव गौरी तालुका नायगाव येथे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे आज दि.२४ ऑगस्ट रोजी आयोजन करण्यात आले असून या निमित्त विविध कार्यक्रम होणार आहेत. सकाळी ८ वाजता ध्वजारोहण करण्यात येणार असून दुपारी दोन वाजता अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची गावातील प्रमुख मार्गाने भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

सायंकाळी पाच वाजता महाराष्ट्र सरकारने मातंग समाजासाठी स्वातंत्र्य आर.टी.ची स्थापना करण्यात महत्त्वाची भूमिका घेऊन सातत्याने पाठपुरावा केल्याबद्दल मान्यवर मंडळींचा जयंती मंडळाच्या वतीने नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला असून सायंकाळी सहा वाजता सप्तखंजेरी वादक सुप्रसिद्ध समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. जयंती मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार सोहळा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार राजेश पवार राहनार आहेत.तर कार्यक्रमाचे उद्घघाटक म्हणून राजेश कुंटूरकर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. सत्कारमूर्ती म्हणून उमरखेड विधानसभेचे आमदार नामदेवजी ससाने, विधान परिषद सदस्य मा.आ. अमित गोरखे यासह जि.प. सदस्या पुनम पवार, रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनी श्रीधर जगताप, मारोती वाडेकर, उत्तम गवाले, कैलास भालेराव, प्रीतम गवाले, गंगाधर कोवेवाड, राजेंद्र रेड्डी, गायकवाड, यासह अनेक मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून या कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष म्हणून शेळगाव गौरीचे सरपंच तथा प्राचार्य मनोहर तोटरे हे राहनार आहेत तरी या आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमास परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन येथील अण्णाभाऊ साठे जयंती मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## प्रा. सय्यद अन्सार यांना पीएच.डी.

**नवीन नांदेड-** विष्णूपुरी, नांदेड येथील सहयोग सेवाभावी संस्थेअंतर्गत इंदिरा



कॉलेज ऑफ फार्मसीचे प्रा. सय्यद अन्सार यांना सनराइज् विश्वविद्यालय अलवर राजस्थान च्या वतीने विद्यावाचस्पती अर्थातच पीएच.डी. ही पदवी घोषित करण्यात आली.

सदरील पीएच.डी.अभ्यासासाठी डॉ. भारत वासुदेव टेकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. सय्यद अन्सार यांनी औषधनिर्माणशास्त्र या विषयांतर्गत डेव्हलप अँड कॅरेक्टराईज सुपर प्यारामॅग्नेटिक आयार्न ऑक्साईड नॅनो पार्टिकल्स फॉर टुमर टारगेटिग टु अमिलोरेट डॉक्स असोसिएटेड कॉर्डियोटॉक्सिसिटी या विषयावर अलवर, राजस्थान येथील सनराइज् विश्वविद्यालयाकडे शोधप्रबंध सादर केला.

## नांदेड जिल्हा बंद शांततेत पाळा:शिवसेनेचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,२३ ऑगस्ट -**

राज्यातील कोल्हापूर, बदलापूर, अमरावती, अकोला येथील विद्यार्थिनींवरील लैंगिक अत्याचारप्रकरणी निर्लज्ज महायुती सरकारचे डोळे उघडण्यासाठी व त्यांना जाब विचारण्यासाठी महाविकास आघाडीच्या वतीने शनिवार दिनांक २४ ऑगस्ट रोजी नांदेड जिल्हा बंदचे आवाहन करण्यात आले आहे. हा बंद शांततेत पाळावा असे आवाहन शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख दत्ता पाटील कोकाटे, जिल्हाप्रमुख बबन बारसे आणि प्रमोद उर्फ बंडू खेडकर यांनी केले आहे.

राज्यात महिलांवर दिवसेंदिवस अत्याचार वाढत आहेत. त्यात विशेष करून विद्यार्थिनी, बालिका यांचा समावेश आहे. नुकत्याच झालेल्या बदलापूर पूर्व व कोल्हापूर येथील घटना ह्या माणुसकीला काळीमा फासणार्या आहेत. राज्यात दररोज एक महिला अत्याचाराची घटना समोर येत असल्याने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणीही उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे. महाविकास आघाडीसोबत शनिवारी होणाऱ्या बंदमध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना सक्रिय सहभागी होणार आहे. बंदच्या काळात कुठेही अनुचित घटना घडणार नाही याची काळजी आंदोलनकर्त्यांनी घ्यावी. बंद शांततेत पाळावा असे आवाहनही उद्धव बाळासाहेब ठाकरे जिल्हा शिवसेनेच्या वतीने करण्यात आले आहे.

## महाविकास आघाडीच्या वतीने शनिवारी भोकर बंदचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,२३ ऑगस्ट -**

बदलापूर येथील बालिके वरील अत्याचार व कोलकत्ता येथील महिला डॉक्टर वर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या विरोधात तसेच महाराष्ट्रामध्ये महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या घटनेचा निषेध नोंदविण्यासाठी महाविकास आघाडीतर्फे दि. २४ ऑगस्ट शनिवारी भोकर बंदचे आवाहन करण्यात आले आहे.

दि.२२ ऑगस्ट रोजी महामहिम राज्यपाल यांना तहसीलदार यांच्या मार्फत पाठविलेल्या निवेदनामध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्रामध्ये दिवसेंदिवस महिलेवर आणि बालिकेवर शाळेमध्ये आणि शाळेच्या बाहेर मोठ्या प्रमाणात अत्याचार होत आहेत, महिला ह्या कुठेच सुरक्षित राहत नाहीत, त्यामुळे त्याची नैतिक जबाबदारी स्वीकारून मुख्यमंत्री व गृहमंत्री यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा असेही निवेदनामध्ये म्हटले आहे, या सर्व घटनेचा निषेध म्हणून दि.२४ रोजी शनिवारी भोकर बंद करणार असल्याचे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना उबाठा आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गट, यांच्यावतीने निवेदन देण्यात आले असून शांततेच्या मार्गाने भोकर बंद ठेवून सहकार्य करण्याचे आवाहन प्रकाश देशमुख भोसीकर, बाळासाहेब पाटील रावणगावकर, गोविंद बाबा गौड पाटील, एडवोकेट शिवाजी कदम, संतोष आलेवाड, तौसीफ इनामदार, सुभाष पाटील किन्हाळकर, निळकंठ वर्षेवार, भीमराव दुधारे, , मनोरमाताई रेड्डी, शफी इनामदार, अफरोज पठाण, सुभाष भालेराव, शिवाजी देवतूळे सुरेश बिल्लेवाड शिवाजी पा. लगळूदकर, मकसूद भाई गोंदवाले, सतीश कदम मातुळकर, धोंडीबा भिसे, बालाजी राजेमोड, विठ्ठल डाखोरे, लक्ष्मण डोंगरे,संजय राऊतवाड, दिगंबर चव्हाण,रमेश गंगासागरे, मारुती झंपलवाड, प्रल्हाद सुंकळेकर, आदिनाथ चिंताकूटे संदीप सुरगुलवार, वैभव व्यवहारे, सम्राट हिरे, राहुल पुरी, अब्दुल मुखीद, सय्यद आशु, शेख साबिर, आरिफ इनामदार, एडवोकेट मुजाहिद, रज्जाक सेठ प्रेसवाले, हामिद पठान, नइम तळेगावकर सुरेखाताई माळे, कमलताई नर्तावार,शेळके मॅडम, शमीम बेगम, सुरेखा गजभारे, पांडुरंग वर्षेवार, सतीश देशमुख, अँड.परमेश्वर पांचाळ साहेबराव भोम्बे, सुभाष नाईक, रमेश महागावकर, माधव वडगावकर,गंगाधर महादावाड, नंदू पाटील कवठेकर, दत्तात्रय पांचाळ, आनंद चिटे, उमेश कापसे, आनंदराव पाटील, मोहन पाटील आदींनी केले आहे.

## कै. जनार्दन आत्माराम चितळे युवा नाट्य प्रशिक्षण शिबिराचे नांदेडमध्ये उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,२३ ऑगस्ट -**

नांदेड येथे तन्मय प्रतिष्ठान व लीला आर्ट्स फाउंडेशन, नांदेड यांच्या वतीने कै. जनार्दन आत्माराम चितळे युवा नाट्य प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नांदेडच्या अध्यक्षा सौ. अपर्णा हृषिकेश नेरलकर, पत्रकार संतोष कुलकर्णी, संयोजक डॉ. नाथा चितळे, सौ नीलिमा चितळे यांची उपस्थिती होती. युवा नाट्य प्रशिक्षण शिबिर दिनांक २२ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आलेले आहे. यावर्षीच्या आयोजनाचे हे ३४ वे वर्ष आहे.

त्यावेळी मान्यवरांच्या हस्ते नटराजाच्या प्रतिमेचे व कै. जनार्दन आत्माराम चितळे यांच्या छायाचित्राचे पूजन करण्यात आले.

यावेळी बोलताना सौ.अपर्णा नेरलकर म्हणाल्या, आपल्या गुरुजनांवर विश्वास ठेवून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास या नाट्य प्रशिक्षण शिबिरातून करावा. आपला अभ्यास सांभाळून आपल्याला छंद जोपासायचे आहेत. तसेच आपण ठरविलेल्या ध्येय मार्गावर वाटचाल करत असताना भरपूर मेहनत घ्यावी लागणार आहे. संतोष कुलकर्णी यांनी यावेळी बोलताना तन्मय ग्रुप व लीला आर्ट्स फाउंडेशनच्या उपक्रमाचे कौतुक केले. नाटकांमधून सामाजिक अभिसरण व्हायला मदत होते. तर्कसंगत विचार करण्याची पद्धत व वेगवेगळ्या सामाजिक प्रश्नांवर आपल्याला बोलते होण्यासाठी लागणारा आत्मविश्वास या नाट्य प्रशिक्षण शिबिरातून युवा रंगकर्मींना मिळेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. प्रारंभी डॉ .प्रणव चौसाळकर व डॉ. किरण कराड यांनी थिएटर गेम घेतले.

यावेळी युवा नाट्यकर्मींना मार्गदर्शन करताना डॉ.नाथा चितळे म्हणाले ' चांगला माणूस घडण्यांमधून चांगला कलाकार घडायला मदत होते. मला जसे मन आहे तसेच मन माझ्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकाला आहे असे आपण समजून घेतले की अनेक प्रश्न संपतात. आपल्या व्यक्तिमत्त्वाची व कर्तृत्वाची चर्चा बंद झाली की आपण संपलो असे आपण समजायला हवे. तुमची समाजाने दखल घ्यायला हवी हाच तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास आहे ' असे ते म्हणाले.



या नाट्य शिबिरात नाट्यक्षेत्रातील सर्वोच्च शिक्षण देणाऱ्या राष्ट्रीय नाट्य शाळा ( एनएसडी, नवी दिल्ली) येथील तज्ञ नाट्य प्रशिक्षक श्रीमती स्नेहलता तागडे( मुंबई) ,श्रीमती खुशबू कुमारी (बिहार), चंदन कुमार ( दिल्ली), सलीम हुसेन मुल्ला (कोल्हापूर), तसेच सोशल मीडियावर नाट्यतंत्रासाठी सुप्रसिद्ध प्रशिक्षक म्हणून कार्यरत असणाऱ्या शिखर पहाडिया थिअटरवाला, दूरदर्शन व चित्रपट क्षेत्रातील उदयोन्मुख अभिनेत्री नांदेडची भूमिकन्या नुपूर चितळे, डॉ. नाथा चितळे या व्याख्यात्यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. हे शिबिर रंग शारदा दालन, कै. शंकरराव चव्हाण नाट्यगृह नांदेड येथे पार पडत आहे. मराठवाड्यातील ३० पेक्षा जास्त युवा नाट्यकर्मी या प्रशिक्षण शिबिरामध्ये सहभागी झाले आहेत. या नाट्य प्रशिक्षण शिबीरामध्ये नाटकातील विविध अंगांची ओळख, संहिता नाट्यलेखन, दिग्दर्शन, नेपथ्य, पार्श्वसंगीत, प्रकाशयोजना, रंगभूषा, वेशभूषा यांचे मार्गदर्शन मिळणार आहे. तसेच चित्रपट व दूरदर्शन मालिकांमध्ये अभिनय, ऑडिशनच्या तयारीसाठीचे मार्गदर्शन मिळणार आहे. उद्घाटन सत्राचे प्रास्तविक डॉ किरण कराड यांनी केले.


सिडको

**(शहर व औद्यागिक विकास महामंडळ, महाराष्ट्र मर्या.)**

**नवीन नांदेड**

**जाहीर प्रगटन**

राज्य शासनाने दिनांक 15 मार्च 2024 च्या निर्णयाद्वारे सिडको वाळूज महानगर प्रकल्पाकरीता 'अभय योजना' राबविण्यास मान्यता दिली आहे. त्याच धर्तीवर सदर योजनेस शासनाने सिडकोच्या नवीन शहरे प्रकल्पांतर्गत (छत्रपती संभाजीनगर, नांदेड, नाशिक, न ागपूर प्रकल्प) देखील लागू करण्यास शासनाने विहीत कालावधीकरीता मान्यता दिली आहे. सदर योजनेनुसार -

(१) भूखंडधारक / गाळेधारक / घरमालक यांचेकडे दिनांक 31/03/2024 अखेर थकीत असलेले सेवाशुल्क व विकासशुल्क दिनांक 30/06/2024 रोजीपर्यंत भरल्यास देय एकूण रकमेवर 50% सवलत देण्याची 'अभय योजना' (Amnesty Scheme ) राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर अभय योजना वाळूज प्रकल्पाव्यतिरीक्त सिडकोच्या इतर प्रकल्पांसाठी देखील लागू करण्यात आली आहे.

(२) सिडको वाळूज प्रकल्पासह, छत्रपती संभाजीनगर, नाशिक आणि नांदेड सिडको प्रकल्पातील मालमत्तांकरीता विकासकाने / मालमत्ताधारकाने दिनांक 31/03/2024 अखेर प्रलंबित / देय अतिरीक्त भाडेपटटा शुल्काचा दिनांक 30/06/2024 रोजीपर्यंत भरणा केल्यास एकूण देय रकमेवर 50 % सवलत देण्यास देखील मान्यता देण्यात आलेली आहे. मात्र सदर योजनेचा लाभ घेतल्यानंतर पुढील 04 वर्षाच्या आंत बांधकाम पूर्ण करणे बंधनकारक आहे.

सदर अभय योजनेअंतर्गत विकासक/मालमत्ताधारकांना ५० % सवलत देण्यासंदर्भात अर्ज करण्यास दिनांक १५ सप्टेंबर २०२४ रोजीपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

करीता या जाहीर प्रगटनांद्वारे नवीन शहरे प्रकल्पातील सर्व संबंधीत मालमत्ताधारकांना सुचित करण्यात येते की, शासनाच्या अभय योजना सुवर्णसंधीचा दिनांक 15/09/2024 पर्यंत लाभ घ्यावा.

**मुख्य प्रशासक (नवीन शहरे)**
**सिडको, छत्रपती संभाजीनगर**